बुधवार, २३ नोव्हेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१०२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESAY 23 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-102 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# भारतीय लष्कर सज्ज !

## लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी : पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याच्या हालचालींना वेग

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारत पाकव्याप्त काश्मीर परत घेण्यासाठी सज्ज असल्याचे लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी म्हटले आहे. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीर परत घेण्यासाठी भारताकडून हालचाली सुरू असल्याची चर्चा जोर धरत आहे. याबाबतचे वृत्त एबीपी माझा या मराठी वृत्तवाहिनीने दिले आहे.**

गेल्या अनेक वर्षांपासून पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा प्रलंबित असून भारत आणि पाकिस्तान सीमेदरम्यान यामुळे सतत तणावाचे वातावरण असते. भारतीय लष्कराचे उपेद्र द्विवेदी यांनी यासंबंधी एक वक्तव्य केले आहे. ते म्हणाले की, पाकव्याप्त काश्मीरवर कारवाई करण्यासाठी भारतीय लष्कर पूर्णपणे तयार आहे. भारत सरकारने आम्हाला जर आदेश दिला तर कोणत्याही कारवाईसाठी भारतीय लष्कर सज्ज आहे. भारताचा सर्वात उत्तरेकडील भाग म्हणजे गिलगिट बाल्टिस्तान होय. स्वातंत्र्यानंतर याच प्रदेशावर पाकिस्तानी लष्कर आणि घुसखोरांनी ताबा मिळवला आणि तेव्हापासून हा भाग पाकिस्तानकडे आहे. या प्रदेशावर भारताकडून दावा केला जात आहे, तसाच पाकिस्तानकडूनदेखील या प्रदेशावर दावा केला जात आहे. भारतीय वायूदलाच्या वतीने 27 ऑक्टोबर रोजी शौर्यदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याममध्ये बोलताना संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकव्याप्त काश्मीर भारतात परत आणण्यासाठी भारताकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत दिले होते. ते म्हणाले होते की, पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानी लष्कराकडून लोकांवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत आहे. त्याचा परिणाम पाकिस्तानला भोगावाच लागेल. गिलगिट आणि बाल्टिस्तान हे प्रदेश पाकिस्तानकडून भारतामध्ये परत आणल्यानंतरच भारताचे मिशन पूर्ण होणार.



### पाकव्याप्त काश्मीर भारताचा अविभाज्य भाग

जम्मू काश्मीरचा उत्तरेकडील भाग असलेला गिलगिट बाल्टिस्तान हा भाग सध्या पाकिस्तानच्या नियंत्रणाखाली आहे. भारत-पाकिस्तानची फाळणी झाल्यानंतर हा भाग भारतात सामील झाला होता. पण पाकिस्तानने या भागात घुसखोर आणि लष्कर घुसवले आणि गिलगिट बाल्टिस्तानचा भाग बळकावला. यावेळी पाकिस्तानचे लष्कर श्रीनगरपर्यंत पोहोचले होते. पण भारतीय लष्कराने त्यांना मागे सारले. त्यानंतर संयुक्त राष्ट्रांने या ठिकाणी युद्धबंदीची घोषणा केली. त्यामुळे या ठिकाणची परिस्थिती जैसे थे ठेवण्यात आली. तेव्हापासून पाकिस्तानने या भागावर आपला दावा सांगितला आहे. पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून तो एक दिवस भारत परत मिळवणारच असा विश्वास भारताकडून व्यक्त केला जात आहे.

## चर्चेतली बातमी

### फिफा वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकावा : भाजप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** वादग्रस्त मुस्लिम धर्मप्रचारक झाकीर नाईकला कतार फिफा विश्वचषक स्पर्धेसाठी आमंत्रित करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर गोव्यातील भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते सॅव्हिओ रॉड्रीक्स यांनी भारत सरकारकडे एक मागणी केली आहे. भारतीय फुटबॉल असोसिएशनने कतार विश्वचषक स्पर्धेवर बहिष्कार टाकावा असे रॉड्रीक्स म्हणाले आहेत. तसेच रॉड्रीक्स यांनी कतारमध्ये जाणाऱ्या भारतीयांनीही या स्पर्धेतील सामने पाहण्यासाठी जाऊ नये असे आवाहन रॉड्रीक्स यांनी केले आहे. फिफा विश्वचषक स्पर्धा २०२२ च्या उद्धाटन समारंभामध्ये कतारने भारतातून फरार असलेला वादग्रस्त मुस्लिम धर्मप्रचारक झाकीर नाईकला इस्लाम या विषयावर भाषण देण्यासाठी आमंत्रित केल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. याचविरोधात रॉड्रीक्स यांनी एक पत्रक जारी केले आहे. एकीकडे संपूर्ण जग दहशतवादाला तोंड देत असतानाच दुसरीकडे अशाप्रकारे झाकीर नाईकला आमंत्रित करुन दहशतवादाबद्दल सहानुभूती दाखवून द्वेष पसरवण्याचा हा हा प्रकार आहे, असे रॉड्रीक्स यांनी म्हटले आहे. फिफा विश्वचषक स्पर्धा ही जागतिक स्तरावरील स्पर्धा आहे. जगभरातील चाहते ही स्पर्धा पाहण्यासाठी येतात. तसेच कोट्यावधी लोक इंटरनेट आणि टीव्हीवरुन हे सामने पाहतात. अशा ठिकाणी झाकीर नाईकला मंच उपलब्ध करुन देणे अयोग्य आहे.

# सीमा सुरक्षा दलातील जवान गायत्री जाधवचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** बथनाहा जिल्हा अररिया बिहार येथे सीमा सुरक्षा दलात कार्यरत असणारी देवगाव येथील कु. गायत्री विठ्ठल जाधव (वय२३)चे आज निधन झाले. अत्यंत गरिबीची परिस्थिती असल्याने गायत्रीने रोजंदारी करत देवगाव येथील डी.आर.भोसले विद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर लासलगाव नूतन महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. त्यानंतर लासलगाव येथीलच पार्थ अकॅडमी येथे ट्रेनिंग घेतले. स्टाफ सिलेक्शन मध्ये सीमा सुरक्षा दलात दि.२१ मार्च २१ रोजी अलवर राज्यस्थान येथे ट्रेनिंगसाठी तिची निवड झाली. राज्यस्थान मध्ये ट्रेनिंग पूर्णत्वास जात असताना तिचा खड्ड्यात पडून अपघात झाला. त्यानंतर अलवर राज्यस्थान येथे मेंदूवर शास्त्रक्रिया करण्यात आली व परत ट्रेनिंगला रुजू झाली. परत त्रास जाणवू लागल्याने एस



एम एस हॉस्पिटल जयपूरला परत मेंदूवर शस्त्रक्रिया करण्यात आली व ती पुन्हा ट्रेनिंगला रुजू झाली. ट्रेनिंग पूर्ण झाल्यानंतर दि.३० मार्च २२ रोजी एस. एस. बी. बथनाहा जिल्हा अररिया बिहार येथे नेपाळ सीमेवर नियुक्ती झाली. मात्र रुजू झाल्यानंतर तिला पुन्हा त्रास जाणवू लागल्याने ती सुट्टी घेऊन घरी आली. त्यानंतर नाशिक येथील दोन खाजगी दवाखान्यात उपचार केल्यानंतर दि.१ जून रोजी मुंबई येथील लीलावती हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे तीन महिने उपचार घेतल्यानंतर तिला पुन्हा त्रास जाणवू लागल्याने अधिक उपचारासाठी एम्स दिल्ली संदर्भ देण्यात आला मात्र तिथे जाण्यापूर्वी आज दुपारी तिची तब्येत खूप खालावली व दृष्टी गेल्याने तातडीचा उपचार म्हणून ग्रामीण रुग्णालयात दाखल केले मात्र आज दुपारी २.१४ वाजता दुर्दैवाने तिचे निधन झाले. गायत्री अत्यंत बुद्धिमान व जिद्दी असल्याने सैन्यात जाण्याचा तिचा मानस होता. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातून सैन्यात जाणाऱ्या पहिल्या दोन मुलींमध्ये व निफाड तालुक्यात सैन्यात जाण्यात तिचा पहिला नंबर लागतो. गायत्रीच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असून तिच्या उपचारासाठी तब्बल ८ लाख रुपये खर्च आला आहे.

# तब्बल 10 वर्षानंतर साठे महामंडळाला मिळाला निधी

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**औरंगाबाद :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातर्फे 1 लाख रुपयांच्या थेट कर्ज योजनेसाठी इच्छुक असणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. 2014 नंतर प्रथमच शासनाच्या वतीने सन 2022-23 साठी 100 कोटी रुपये अनुदान जाहीर झाले असून यांत औरंगाबाद जिल्ह्यासाठी एकूण 70 अर्जांचे उद्दिष्ट आहे. थेट कर्ज योजनेच्या माध्यमांतून मोबाईल सर्व्हिसिंग, रिपेअरिंग, इलेक्ट्रिशयन, ब्युटी पार्लर, स्टोअर, ड्रेस डिझायनिंग, टेलरिंग, फूड प्रोसेसिंग, झेरॉक्स, ज्यूस सेंटर अशा विविध व्यवसायांसाठी कर्ज दिले जाणार असून महामंडळाची पूर्वी असणारी 300 कोटी रुपयांची मर्यादा आता 1 हजार कोटींवर नेण्यात आली आहे. आणि त्यांतीलच पहिला टप्पा हा 100 कोटींचा असून त्यांत 70 लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात येणार आहे. 28 नोव्हेंबर पासून ते 20 डिसेंबर या कालावधीत संबंधित कार्यालयात सकाळी 10 ते सायंकाळी 5 या वेळेत इच्छुक अर्जदारांनी कर्ज मागणीचे अर्ज सादर करावेत या तारखेनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही. तसेच कर्जासाठी लाभार्थ्यांची निवड ही निवड समिती लॉटरी पद्धतीने करणार आहे. ही बाब लक्षात घेऊन मातंग समाजातील शहरी व ग्रामीण भागांतील सुशिक्षित तरुण तरुणींनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या औरंगाबाद कार्यालयातील प्रादेशिक व्यवस्थापक के.बी.पवार यांनी केले आहे.

**मोठ्या प्रमाणात विभागात कर्ज थकीत :** औरंगाबाद, जालना, बीड परभणी येथे 16,399 लाभार्थ्यांकडे कर्ज थकीत असून आतापर्यंत व्याजासह 106 कोटी 40 लाख 4 हजार 704 एवढी थकबाकी आहे आणि ही रक्कम वसुली करण्यासाठी महामंडळाने पथकाची वसुली मोहीम काढली होती परंतु त्यांत सुद्धा त्यांना अपयश आल्याचे समोर दिसून आले आहे.

# राज्यातील काँग्रेस कमिटी कार्यालयात पीक विमा मदत कक्ष

## शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी लढा देणार : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

शेगाव : राज्यातील शेतकरी मोठ्या संकटातून जात आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे संपूर्ण खरीप उद्धवस्त झाले आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी पीकविम्याचे हप्ते भरले आहेत पण अद्यापही त्यांना शासकीय मदत किंवा पीक विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळालेली नाही. मोदी सरकारच्या आशीर्वादाने विमा कंपन्याकडून शेतकऱ्यांची खुले आम लूट सुरू आहे. ती थांबवून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष लढा देणार आहे अशी घोषणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

शेगाव येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना नाना पटोले म्हणाले की, भारत जोडो यात्रा महाराष्ट्रातून प्रवास करत असताना हजारोंच्या संख्येने शेतकरी राहुलजींना भेटले, अतिवृष्टी, पुरामुळे प्रचंड नुकसान झाल्याचे सांगितले तसेच पीक विमा कंपन्यांकडून अद्याप मदत मिळाली नसल्याचे सांगितले. त्यांनी मांडलेली व्यथा पाहून या शेतक-यांच्या मदतीसाठी लढा देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. यासाठी राज्यातील सर्व जिल्हा व तालुका काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात पीक विमा मदत कक्ष स्थापेन करण्यात येणार आहे. ज्या शेतक-यांनी पीक विमा भरला आहे पण त्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही अशा शेतकऱ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक व पीकविमा भरल्याची पावती (झेरॉक्स) ही कागदपत्रे





जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पीकविमा कक्षात जमा करून घेण्यात येणार आहेत. राज्यातील शेतक-यांना पीकविमा मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष पाठपुरावा करून लढाई लढेल असे पटोले म्हणाले.

पीक विमा कंपन्या सरकारी आशिर्वादाने प्रचंड नफेखोरी करत आहेत. शेतक-यांना मदत करण्याऐवजी विमा कंपन्याकडून गरीब शेतक-यांची लूट सुरु आहे. त्यांची ही मनमानी आता खपवून घेतली जाणार नाही. या कंपन्यांविरोधात काँग्रेस पक्ष आता मैदानात उतरणार असून कंपन्यांनी शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई दिली नाही तर त्या विमा कंपन्यांना महाराष्ट्रात काम करु दिले जाणार नाही असा स्पष्ट इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी दिला आहे.

### कोश्यारींची राज्यपालपदाची पात्रता नाही

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी वारंवार महाराष्ट्रातील महापुरुषांचा आणि समाजसुधारकांचा अपमान करत आहेत. महापुरुषांचा अवमान करणे हाच भाजपचा अजेंडा आहे. भाजपचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे त्यांचा निषेध करण्याऐवजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांची पाठराखण करत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. फडणवीसांना आता शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा अधिकार राहिलेला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वारंवार वादग्रस्त वक्तव्ये करून आणि खोटी माहिती पसरवून महाराजांचा अपमान करून भाजप नेते आणि विविध पदांवर त्यांनी बसवलेले संघाचे बाहुले आपल्या बौद्धिक दिवाळखोरीचे प्रदर्शन करत आहेत. महाराष्ट्रातील जनता यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# स्वामीकृपा

आधुनिक केसरी

अनुभवाच्या जोरावर पुढे चांगले काम मिळेल या आशेवर तो ते काम करीत होता. नितीनचे आईवडील रेश्माच्या घरी येऊन तिला पाहून गेले आणि हुशार चुणचुणीत असलेली रेश्मा सून म्हणून त्यांना आपल्या मुलासाठी पसंत होती. मग नितीन आणि रेश्मा यांचीही भेट झाली. पहिल्या भेटीतच दोघांनी एकमेकांना पसंती दिली. नितीन आणि रेश्मा जोडीही छान दिसत होती. दोघेही एकमेकांना अनुरूप होते. यथावकाश योग्य मुहूर्त पाहून देशमुख आणि पाटील कुटुंबीयांनी त्यांचे लग्न करून दिले आणि रेश्मा सून म्हणून पाटील कुटुंबियांच्या घरी आली. सुरुवातीचे काही महिने छान गेले. नव्या सुनेचे कोडकौतुक झाले. पण नांतर घरात वादाला सुरुवात झाली. रेश्माची नणंद लग्न होऊन त्याच गावात राहत होती. तिचे सारखे घरी येणेजाणे सुरु असायचे. ती घरी आली की रेश्माची सासू आणि तिच्या तासनतास एका खोलीत गप्पा चालायच्या. घरामध्ये शेती आणि प्रॉपर्टीचे



वाद सुरु झाले. रेश्माच्या नणंदेने आपल्या आईचे असे काही कान भरले की तिला सुरुवातीला आवडलेली ही सून घरात नकोशी झाली. याची परिणीती रेश्माला त्रास देण्यात होऊ लागली. मुळात सोशिक असलेली रेश्मा चकार शब्द न काढता हे सगळे सहन करत होती. कारण नितीनला मुंबईला चांगली नोकरी नव्हती. घर नव्हते. पण एकदा त्याच्या आईनेच नितीनला घरी बोलावून घेतले आणि हिला तुझ्या सोबत काही करून मुंबईला घेऊन जा असे सांगितले. नितीनने रेश्माची समजूत घातली. मी घर बघेपर्यंत इथे थांब. घर मिळाले की लगेच मी येऊन तुला घेऊन जाईन असे सांगितले. आणि लवकरच त्याला मुंबईच्या एका उपनगरात एक वन रम किचन भाड्याने मिळाले. तो गावी येऊन रेश्माला घेऊन निघाला. निघताना सासूने फारसे सामान घेऊ दिले नाही. देव्हाऱ्यातील अन्नपूर्णेची मूर्ती आणि स्वामी समर्थांची प्रतिमा तिने रेश्माच्या हातात ठेवल्या. स्वाभिमानी आणि समाधानी असलेल्या रेश्माने त्यांचा आनंदाने स्वीकार केला आणि दोघेही मुंबईला आली . हळूहळू त्यांची घडी बसू लागली. **क्रमशः**



# आनंदी पहाट


## मन:शांती प्राप्तीचे प्रयत्न निरंतर करावेत

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडले आहे, हे आपल्याला माहिती असतेच किंवा ते कालांतराने माहिती होतेच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणे हे नेहमीच उपयोगाचे ठरते असे नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो. काहीवेळा नकारात्मक विचार आपल्या अंतर्मनांत थैमान घालायला लागतात आणि भ्रमातले आपण संभ्रमांत जखडून राहतो. चांगले-वाईट, चूक-बरोबर, खरे-खोटे अशा अनेक समस्या आपल्याला भेडसावत राहतात. अशावेळी, आनंद तर नाहीच पण दुःख आणि निराशा पदरी येते. मग आपण दोष मात्र आपल्या नशिबाला नाहीतर परमेश्वरालाच देत राहतो. अनेकदा नकारात्मक विचारच आपले नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानाने आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचे अनुभवायला येऊ लागते. कालचा दिवस संपला, तरच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपले नवे आयुष्यच जणू काही सुरु होत असते. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच पण शिवाय मन:शांती अधिक प्राप्त होत राहते. हल्ली जगात पैशाने काहीही विकत घेता येते आणि विकताही येते. असे जरी असले तरीही मन:शांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वतः आनंदाची निर्मिती करायची असते. त्याची अनेकदा आपण अपेक्षा इतरांकडून करतो, पर्यायाने निराश होतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## भवसिंधु हा तो | पार करा ||

माझा देव उभा | पाहा विटेवरी ||
भक्तास हा तारी | सर्वकाळ ||१||
समतेची विट | मोक्षाचे ते द्वार ||
प्रेमभाव स्थिर | त्याचे ठायी ||२||
सावळ्याचे अंगी | शोभे पितांबर ||
आत्मा निरंतर | चरणाशी ||३||
कंठी रूळे माळ | तुळशीची भक्ती ||
नको जीवा सक्ती | संसाराची ||४||
कटेवरी हात | ठेऊनी सांगतो ||
भवसिंधु हा तो | पार करा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी


## जागी सदैव माता

खरे सांगतो तुम्हासी।
काही नाही दिले अंबेसी।
विचारे केली याचना।
माये भाकली करूणा।
असे लेकराच्या हिता।
जागी सदैव माता।
हासे गुरुवचनी निष्ठा।
लाभलेसे सर्वाभिष्टा।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# || बद्ध आणि मुक्त यातला फरक ||



आधुनिक केसरी

बद्ध हे जगाचे असतात. मुक्त हे जगाचे नसून एका भगवंताचे असतात. संतांची चवकशी करताना, त्याची उपासना कोणती, गुरू कोण हे पाहतात. त्याच्या आईबापांची नाही चौकशी करीत. संतांना देहाची आठवण नसते. ते आपला देहाभिमान, मीपण, भगवंताला देतात. परमात्म्यापेक्षा विषयाची गोडी ज्याला जास्त तो बद्ध. विषयाचे प्रेम कमी होणे म्हणजे मुक्तदशेच्या मार्गाला लागणे, ' मी भगवंताचा ' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. आपण बद्ध आहोत हे तरी आपणच बद्ध आहोत ही भावना करून घेतली म्हणून. आपण, मूळ तेच रूप स्वयंसिद्ध असताना, सर्व इंद्रिये मिळून होणारा देह मी आहे असे म्हणतो; आणि त्यामुळे देहाला जे सुखदुःख होते ते आपल्याला झाले असे म्हणतो. आत्मा स्वतः त्यापासून अलिप्त असतो. परंतु आत्मा आणि देह वेगळा नाही असे आपण म्हणत असतो; म्हणून मी तोच देह आणि हा देह तोच आत्मा, अशी आपली भावना दृढ झालेली असते. परंतु आपण बोलण्यात मात्र ' माझा ' हात दुखावला किंवा 'माझ्या ' पोटात दुखते, असे म्हणतोच की नाही ? म्हणजे, प्रत्येक अवयव 'माझा' म्हणणारा कुणीतरी वेगळा आहे हे खरे; आपल्याला ते बरोबर समजत नाही इतकेच. मीपणा हा आपल्यात इतका बाणलेला असतो.

आपले मन विषयाच्या आनंदात रंगले, म्हणून तिथे आपण आपलेपणाने वागतो. परंतु विषयच जिथे खोटे, तिथे मन रंगूनही, ते नाहीसे झाले म्हणजे आपल्याला दुःख हे होणारच. आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलो म्हणूनही सुखदुःख होते. म्हणून, आपण त्या सर्वांपासून निराळे आहोत असे समजून वागावे. हे होण्यासाठी परमेश्वराची भक्ति करायला पाहिजे. भक्तिला जर काही आड येत असेल तर आपली देहबुद्धीच होय; आणि ती गेल्याशिवाय खरी भक्ति होणारच नाही. तरी आपण परमेश्वराचे आहोत असे समजून वागावे. जे जे होईल ते ते त्याची इच्छा म्हणून झाले असे समजून वागू लागलो, म्हणजे आपली देहबुद्धी हळूहळू कमी होत जाईल. याकरिता काही तप, याग वगैरे करावे लागत नाही. संसार सोडून वनातही जावे लागत नाही आणि विशेष आटाआटीही करावी लागत नाही. जे घडते ते ' मी केले' हा मीपणा टाकून, ' मी देवाचा आहे ' असे म्हणून, आणि जे होईल त्यात आनंद मानून राहावे, म्हणजे मीपणा सुटत जाईल. हे ' मी ' केले नाही, परमात्म्याच्या इच्छेने झाले, असे मानले म्हणजे मीपणा राहिला कुठे ?

**आजचे बोधवचन आहे :** ज्याप्रमाणे, मनाने ' मी देहाचा आहे ' अशी समजून झालेल्याने आपण देहरूप बनलो, त्याचप्रमाणे मनाने ' मी भगवंताचा आहे ' असे म्हणत गेल्याने आपण भगवद् रूप बनून जाऊ.



# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

***नसे गर्व आंगी सदा वीतरागी।***
***क्षमा शांति भोगी दया दक्ष योगी।***
***नसे लोभ न क्षोभ ना दैन्यवाणा।***
***यही लक्षणी जाणिजे योगिराणा।।१३४।।***

**श्लोकार्थ :** संतांचे गुणवर्णन या श्लोकात पाहायला मिळते. गर्व नसलेला, ऐहिकाची आवड़ नसलेला, दया, क्षमा, शांती, जेथे अखंड असतात, शांतचित्त, अलोभी, योगिराज अशी विविध गुण सांगितले आहेत.

**विवेचन :** आपल्याकडे सगुण उपासनेचे महत्व सर्व संतांनी सांगितले आहे. सगुण पूजचे अनेक प्रकारे केले जाते. पैकी एक प्रकार आहे, भगवंताच्या सर्व गुणांचे पूजन करणे म्हणजे सगुण पूजा. थोडक्यात भगवंताचा एकेक गुण आत्मसात करणे.

"अखंड योग म्हणोनि योगी ।योग नाहीं तो वियोगी ।वियोगी तोहि योगी ।योगबळें ॥" (दा.१७.०१.२३) दासबोधातील या ओवीत आपल्याला योग्याची लक्षणे सांगितलेली आहेत. जो साधक भगवंताच्या अखंड अनुसंधानात रहातो, त्याला योगी म्हणता येईल. जी अनुसंधान ठेऊ शकत नाही किंवा ज्याने आजपर्यंत तसा प्रयत्न केला नाही असा मनुष्य सुद्धा अभ्यासाच्या योगाने, सद्गुरूंच्या कृपेने अखंड अनुसंधान साधून योगी होऊ शकतो. सामान्य मनुष्याला तीन प्रकारे आपले जीवन घडवता येऊ शकेल असे वाटते. एक तर भोगी होईल आणि भोगी झाल्यामुळे कालांतराने तो रोगी होऊ शकेल. दुसरा पर्याय आहे तो प्रयत्नपूर्वक साधना करून योगी होऊ शकेल. काही लोकांचे आडनाव योगी असते, म्हणून ते योगी असतीलच असे नाही. तर इथे आपल्याला मनाने योगी व्हायचे आहे. त्यासाठी कोणकोणते गुण अंगी असावेत किंवा आत्मसात केले जावेत याचे सुस्पष्ट वर्णन समर्थ या श्लोकात करीत आहेत. एकनाथी भागवतात श्री संत एकनाथ महाराज म्हणतात, *"अनन्य करितां माझें भजन ।माझ्या स्वरूपीं झगडलें मन । सकळ वासना गेल्या विरोन । वृत्तिशून्य अवस्था ॥६२॥"* (एकनिष्ठेने भजन केले असतां मन माझ्याच स्वरूपावर जडून राहते, आणि सर्व वासना नष्ट होऊन वृत्ति शून्य झाल्याप्रमाणे स्थिति होते) श्रीमद्भगवद्गीतेत सांगितलेली उत्तम भक्ताची लक्षणे अथवा दासबोधात उत्तम पुरुषांची लक्षणे यापेक्षा वेगळी नाहीत. जगात सर्वात श्रीमंत कोणाला म्हणता येईल ? तुम्हाला वाटेल हा काय प्रश्न आहे ? ज्याच्याकडे सर्वात जास्त संपत्ती तो सर्वात जास्त श्रीमंत. लौकिक दृष्ट्या हे उत्तर कदाचित पूर्ण गुण देऊ शकेल, परंतु सर्व संतांच्या मते श्रीमंतांची व्याख्या थोडी वेगळी आहे. ज्याचे मागणं (हवेपण) संपल तो सर्वात श्रीमंत. 'असेल तर असू दे, नसेल तर नसू दे' अशी वृत्ती ज्याला बनविता येईल, तो संतांच्या प्रमाणे श्रीमंत होऊ शकेल. सर्व संतांनी अनेक हाल अपेष्टा सहन केल्या. माऊलींसहित त्यांच्या भावंडांना वाळीत टाकण्यात आले, तुकाराम महाराजांची गाढवावरून धिंड काढण्यात आली, त्यांनी लिहिलेली गाथा त्यांना इंद्रायणीच्या डोहात बुडवावी लागली, यातील एक गोष्ट जर आपल्या सारख्या सामान्य माणसाच्या बाबतीत झाली असती तर आपण प्रतिसाद दिला असता की प्रतिक्रिया ? आपण प्रतिक्रियाच दिली असती आणि तिचे स्वरूप काय असते ? हे आपण आपल्या मनाशी ठरवावे आणि योगी होण्यासाठी आपल्याला किती मजल मारावयाची आहे हेही ठरवावे. आनंताचा पंथ चालताना आपण सध्या कुठे आहोत हे कळलं की पुढील मार्गक्रमण कसे करायचे हे ठरवणे सोपे जाते. पटतंय ना ? "प्रत्ययेज्ञानी वीतरागी ।विवेकबळें सकळ त्यागी ।तो जाणीजे माहांयोगी ।ईश्वरी पुरुष ॥" (दा. १२.०७.१८) ज्याचे हवेनकोपण संपते त्याला कधीही क्षोभ होत नाही. योगी मनुष्य कधीही चिडत नाही, रागवत नाही कारण त्याची देहबुद्धी क्षीण झालेली असते. देहबुद्धी क्षीण झाल्यामुळे मानापमान यापासून हा मनुष्य शेकडो मैल दूर रहातो. दया क्षमा शांती त्याच्या ठायी वास करून असतात. त्यांच्यातील आपपर भाव नष्ट झालेला असतो. असा अजातशत्रू मनुष्य भगवंताला आवडला नाही तर नवल!. संत तुकाराम महाराज पुढील अभंगात हे अधिक स्पष्ट करून सांगतात. "जे का रंजले गांजले | त्यासि म्हणे जो आपुले ||१|| तो चि साधु ओळखावा | देव तेथे चि जाणावा ||२|| मृदु सबाह्य नवनीत | तैसे सज्जनाचे चित्त ||३|| ज्यासि आपंगिता नाही | त्यासि धरी जो ह्रदयीं ||४|| दया करणे जे पुत्रासी | तेचि दासा आणि दासी ||५|| तुका म्हणे सांगू किती ? | तो चि भगवंताची मूर्ती ||६||"

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# केंद्र सरकारच्या योजना मोदींमुळे सामान्यांच्या घरात

## केंद्रीयमंत्री रावसाहेब पाटील दानवे : देवगाव रंगारी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी येथे विविध विकासकामांच्या भूमिपूजनाच्या संदर्भात तसेच डॉ. संजय गव्हाणे यांच्या संपर्क कार्यालयाच्या उद्‌घाटना निमित्त केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची जाहीर सभा झाली.
त्यांनी आपल्या भाषणात बोलताना म्हणाले की देशाचे यशस्वी व लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्यामुळे केंद्र सरकारच्या योजना सामान्य व्यक्तीच्या घरात पोहोचायला सुरुवात झाली.
यामध्ये महिलांसाठी शंभर रुपयात उज्वला गॅस योजना, तसेच गरीब व्यक्तीसाठी दवाखान्यात आजाराचा उपचार करण्यासाठी आयुष्यमान भारत योजना, कोरोना काळात मोफत कोरोनालची उपलब्धता करून देणे, तसेच शेतकऱ्यांचा सन्मान वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना दरवर्षी त्यांच्या खात्यावर सहा हजार रुपये किसान सन्मान योजनेमार्फत देणे, गरीब कल्याण योजनेच्या अंतर्गत मोफत रेशन धान्य गरिबापर्यंत पोहोचवणे ,तसेच ज्यांना घर नाही त्यांना प्रधानमंत्री घरकुल योजना देणे, तसेच त्या घरापर्यंत नळाचे पाणी पोहोचवणे हर घर नळ योजना, तसेच बेरोजगार तरुणांसाठी मुद्रा योजना, त्यांच्या व्यवसाय वाढीसाठी व्यवसायाला हातभार लावण्यासाठी किंवा व्यवसाय वाढवण्यासाठी तसेच तरुण उद्योजकांच्या नवीन नवीन कल्पना व्यवसायासाठी निर्माण करण्यासाठी स्टार्ट अप इंडिया, स्टॅन्ड अप इंडिया या योजना सुरू करण्यात आल्या. तसेच गावागावात मोफत शौचालय योजना व महिलांसाठी बचत गटामार्फत शून्य दराने कर्ज व्यवसायासाठी उपलब्ध करून देणे. अशा विविध योजना देशाची लोकप्रिय प्रधानमंत्री श्री नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात घराघरापर्यंत केंद्र सरकारच्या मार्फत पोहोचवण्या आता सुरुवात झाली आहेत सामान्य व्यक्तीला केंद्रबिंदू मानून केंद्राचं सरकार व राज्य सरकार काम करत आहे. असे केंद्रीयराज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले .यावेळी ते म्हणाले की महाराष्ट्र सरकारच्या 25 15 या लेखा शीर्ष अंतर्गत पावणेदोन कोटी देवगाव रंगारी सर्कलच्या विकास कामाच्या भूमिपूजनाच्या संदर्भात या ठिकाणी उद्‌घाटन झाले. असे त्यांनी जाहीर केले.




व लवकरात लवकर काम करून जनतेसाठी सोयी उपलब्ध करून द्यावे असे आव्हान त्यांनी केले . यावेळी या कार्यक्रमाला भाजपाचे जिल्हा अध्यक्ष विजयराव अवताडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, या कार्यक्रमाचे आयोजक प्रा. संजय गव्हाणे सर, मा. जि. प. सदस्य. संजनाताई जाधव, तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे, राजकुमार गंगवाल भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य हर्षवर्धन जी कराड, जि. प. सदस्य किशोर आबा पवार, जि. प. सदस्य रमेश जाधव, जि. प. सदस्य सुरेश आण्णा गुजराने पंचायत समिती उपसभापती काकासाहेब तायडे, सुनील निकम, तालुका सरचिटणीस सुभाष काळे, तसेच अजबसिंग राजपूत, ललितजी सुरासे, राजू शेलार, ज्ञानेश्वर बोर्डे, बाळासाहेब घुगे, रमेश मामा नागरे, शहराध्यक्ष सुरेश डोळस, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रदीप बोडके, शहर उपाध्यक्ष संतोष शिरसाट, शिक्षक आघाडी तालुकाध्यक्ष विलास इंगळे, शिवाजी बोरसे सर, नितीनजी भांडवलदार, प्रताप राजपूत, किशोर दिवेकर, अरुण थोरात, हरीश थोरात तसेच भाजपाचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी बूथचे अध्यक्ष शक्ती केंद्रप्रमुख भाजपाचे तालुका प्रतिनिधी लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.



बीडचे माजी जिल्हाधिकारी भा.ई. नगराळे यांच्या आई सायजाबाई यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. मंगळवार दि.22 नोव्हेंबर 2022 रोजी धुळे येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, संपादक संतोष मानुरकर यांनी सांत्वन भेट घेतली. यावेळी पत्रकार संघाचे धुळे जिल्हाध्यक्ष जितेंद्रसिंह राजपुत, संपादक विवेकसिंह सिसोदिया उपस्थित होते.

# लासूरला एम.आय.एम.चा रास्तारोको



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे एम.आय.एम पक्षाच्यावतीने आ. सतीश चव्हाण यांच्या विरोधात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. काही महिन्यांपूर्वी आ.सतीष चव्हाण यानी मोठ्या थाटामाटात लासूर स्टेशनच्या वॉर्ड क्रमांक एक व सहा तसेच मुस्लिम कब्रस्तानात सिमेंट व पेव्हरब्लॉकचे रस्तेचे उद्‌घाटन करण्यात आले होते मात्र अद्यापर्यंत काहीहि काम झालेले नसून कामाला सुरुवातही झालेली नसल्याने एम आय एम च्या वतीने आंदोलन करण्यात आले व शिल्लेगाव पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक युसूफ शेख यांच्याकडे निवेदन देऊन रस्ता रोको आंदोलनाची सांगता करण्यात आली.
दरम्यान यावेळी अजित जाधव ता,ऊप अध्यक्ष, शहर अध्यक्ष योगेश साळवे, यूवा शहर अध्यक्ष अकरम बेग,जेष्ट नेते जूनेद शेख,राजेक सय्यद, छोटू पठान, अम्मू शेख आसिफ सय्यद, वसीम शेख, अनवर शेख, आसिफ शेख, अरशद शेख, यूवा शहर ऊप अध्यक्ष आतिफ शेख, शोसलमिडया अध्यक्ष शाहरूख शहा, अरबाज शहा, बब्बू लिङर बूरहान शेख, गफूर शेख, अकिल शेख, शमी बागवान, तैसिफ शेख, रेहान शेख, जफर सय्यद, शेख मूशसू,जाफर शेख, सरफराज बागवान, भारत गायकवाड, विनोद बागूल ऊपस्थित होते.
अजित जाधव (तालुकापाद्यक्ष एम.आय.एम) आ. सतीश चव्हाण व सार्वजनिक बांधकाम विभाग यानी ह्या आंदोलनांची दखल घ्यावी नसता लोकशाही पद्धतीने पुन्हा आंदोलन  करण्यात येईल आ. चव्हाण यानी मोठ्या थाटामाटात स्थानिक कार्यकर्ते घेऊन विकासकामे करण्याच्या उदघाट्नचा नुसता सपाटा आगामी विधानसभेची रंगीत तालीम करण्याचा केविलवाणा प्रयत्न चालवला आहे मात्र आमचा त्यास विरोध नाही मात्र सोशिअल मीडियावर उदघाट्नचा गाजावाजा केला जातं आहे प्रत्यक्षात काम करून दाखवा नसता पुन्हा व्यापक आंदोलन करण्यात येईल.

# भाजप प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांचा फुलंब्रीत सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा विधान परिषदेचे आमदार चंद्रशेखर बावनकुळे हे जळगाव येथून औरंगाबाद येथे जात असताना फुलंब्री येथील भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी शहराध्यक्ष योगेश मिसाळ व त्यांची पत्नी प्रियांका मिसाळ यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वागत केले. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष तथा नगराध्यक्ष सुहास शिरसाट, उपनगराध्यक्ष अकबर पटेल, प्रियंका योगेश मिसाळ, कोमल वाडेकर, बाजार समितीचे माजी संचालक रवींद्र कथार, नगरसेवक शेखर पालकर, नगरसेवक गजानन नागरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, बाबासाहेब शिंगारे, संतोष जाधव, सचिन डकले, प्रमोद मिसाळ, पुंडलिक वाडेकर, जगन तावडे, मुन्ना शहा, अरुण शेख, राजू पटेल, अज्जू पटेल, सचिन शेरकर, बाळू शेरकर, कय्युम पटेल, सतीश मिसाळ, सुरेश मिसाळ, सोमीनाथ दुतोंडे, अक्षय आढाव, मनोज मिसाळ, अमोल मिसाळ, वैभव दुतोंडे, मनोज राऊत, अजय पाडळकर, नितीन मिसाळ, जगदीश मिसाळ, मुन्ना पाडळकर, सागर माटे, सतीश ढंगारे, अजय नागरे, आकाश गोरावणे, रब्बादी शेख, रंगा भुईगळ, कैलास वखरे, उमेश वानखेडे, संतोष सुरभैये आदि भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भेदभाव का ?

आधुनिक केसरी

भारतीय सैन्यदलात कार्यरत असलेल्या ३४ महिला अधिकाऱ्यांनी पदोन्नती उशीरा होत असल्याच्या कारणावरुन सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. या महिला अधिकाऱ्यांना २०२०मध्ये कोर्टाच्या आदेशानुसार स्थायी कमिशन देण्यात आले होते. सोमवारी या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली असून कोर्टाने केंद्र सरकारला दोन आठवड्यात उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहे. ३४ महिला अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाने बढतीला विलंब होत असल्याची याचिका दाखल केली होती. यात कर्नल प्रियंवदा ए. मर्डीकर आणि कर्नल आशा काळे यादेखील सहभागी आहेत. या दोन्ही अधिकारी स्थायी कमिशन महिला अधिकारी आहेत. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी विशेष निवड समितीवर भेदभाव केल्याचा आरोप केला आहे. कनिष्ठ पुरुष (ज्युनिअर) अधिकाऱ्यांची नाव प्रमोशनसाठी पुढे पाठवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. मुख्य न्यायमूर्ती धनंजय वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या खंडपीठाने सांगितले की, 'या सर्व महिलांना ज्येष्ठता देण्यात यावी, अशी आमची इच्छा आहे.' महिला अधिकाऱ्यांच्या याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यावेळी भारतीय सैन्यदलाचे वकिल आर. बालासुब्रह्मण्यम यांना कोर्टाने काही सवाल केले आहेत. तुम्ही पुरुष अधिकाऱ्यांसाठी विशेष निवड समितीची स्थापना करतात, मग महिलांसाठी का नाही. हे असे कशामुळे होते आहे?, अशा सवाल कोर्टाने केला होता.
या वर उत्तर देताना बालासुब्रह्मण्यम यांनी १५० अतिरिक्त पदांसाठी महिला अधिकाऱ्यांसाठी विशेष निवड समिती बसवण्यात येईल. मात्र केंद्रीय अर्थ मंत्रालयाची मंजूरी मिळाल्यानंतर, असे म्हटले आहे. पुढील सुनावणीपर्यंत कोणताही आदेश पारित करु नये, अशी विनंती भारतीय सैन्य दलाकडून वकिलांना कोर्टाला केली आहे. महिला अधिकाऱ्यांच्या तक्रारीचे लवकरच समाधान केले जाईल. सेनाने दिलेल्या आश्वासनानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दोन आठवड्यांसाठी सुनावणी स्थगित केली आहे. १४ दिवसांच्या आत महिलांच्या प्रमोशनसाठी केंद्र सरकार एका समितीची स्थापना करु शकते, अशी शक्यता आहे.

# राजकीय विवाद आणि न्यायालयीन कचाट्यात सापडलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

गेल्या सहा दशकांपासून महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न राजकीय विवाद आणि न्यायालयीन कचाट्यात सापडला असून अजूनही या प्रश्नाची सोडवणूक न झाल्याने सीमा भागातील  नागरिक सोयीसुविधांपासून वंचित आहे. आता पर्यंत कित्येक सरकारे व आयोग स्थापन करण्यात आले  तरी देखील सीमा प्रश्न सोडविण्यात यश आले नाही. परत एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कायदेशीर लढाई लढण्याची धोरणात्मक घोषणा केली आणि एक समिती स्थापन करण्याची घोषणा केली.

**काय प्रकरण आहे**

बेळगावबाबत कर्नाटक आणि महाराष्ट्रात वाद सुरू आहे. हे शहर कर्नाटकात आहे, परंतु महाराष्ट्राने त्यावर आपला दावा प्रदीर्घ काळापासून केला आहे. बेळगाव, कारवार आणि निप्पाणीसह कर्नाटकातील अनेक भागांवर महाराष्ट्र हक्क सांगतो. ते म्हणतात की या भागातील बहुसंख्य लोकसंख्या मराठी भाषिक आहे. दोन राज्यांमधील सीमावादाचे हे प्रकरण गेल्या अनेक वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

**वादाचे कारण काय?**

देश स्वतंत्र होण्यापूर्वी महाराष्ट्र आणि कर्नाटक ही पहिली राज्ये नव्हती. त्यावेळी बॉम्बे प्रेसिडेन्सी आणि म्हैसूर राज्य असायचे. सध्याच्या कर्नाटकातील अनेक क्षेत्रे तेव्हा बॉम्बे प्रेसिडेन्सीचा भाग होती. स्वातंत्र्यानंतर, राज्यांचे विभाजन सुरू झाले आणि राज्य पुनर्रचना कायदा १९५६ मध्ये अंमलात आला, बेळगावला महाराष्ट्राऐवजी म्हैसूर राज्याचा एक भाग करण्यात आला आणि १९७३ मध्ये म्हैसूर राज्याचे कर्नाटक असे नामकरण करण्यात आले. बेळगावमध्ये मराठी भाषिकांची संख्या मोठी असल्याने राज्य पुनर्रचनेच्या काळापासून हा महाराष्ट्राचा भाग करण्याची मागणी होत आहे. १९५७ च्या सुरुवातीस, महाराष्ट्र सरकारने बेळगावला कर्नाटकचा भाग करण्यास विरोध केला आणि यावर आयोगाची मागणी केली. निवृत्त न्यायाधीश मेहरचंद महाजन यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाने आपल्या अहवालात उत्तरा कन्नड जिल्ह्यातील करवडसह २६४ गावांसह हलियाल आणि सुपा भागातील ३०० गावेही महाराष्ट्राला द्यावीत, अशी शिफारस केली आहे. या अहवालात बेळगाव शहराचा महाराष्ट्रात समावेश करण्याची शिफारसही करण्यात आलेली नाही. या अहवालात महाराष्ट्रातील शोलापूरसह २४७ गावांसह केरळमधील कासारगोड जिल्हा कर्नाटकला देण्याची शिफारसही करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांनी या शिफारशी स्वीकारण्यास नकार दिला.

**महाजन आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी व्हायची आहे**


१९६६ मध्ये केंद्र सरकारने कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यातील सीमा विवादाच्या दाव्यांवर लक्ष ठेवण्यासाठी महाजन आयोगाची स्थापना केली. २,२०० प्रतिनिधित्व प्राप्त केल्यानंतर आणि ७,५०० हून अधिक लोकांच्या मुलाखती घेतल्यानंतर, भारताचे माजी सरन्यायाधीश मेहरचंद महाजन यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाने ऑगस्ट १९६७ मध्ये आपला अहवाल सादर केला. संसदेत अहवाल सादर होईपर्यंत १९७२ आला होता. अहवालात कर्नाटकातील २६४ मराठी बहुसंख्य गावांचा महाराष्ट्रात समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे, परंतु बेळगावी आणि २४७ गावे कर्नाटकातच राहतील असा आग्रह धरण्यात आला आहे. अनेक दशके उलटून गेली आहेत, परंतु केंद्र सरकारने अद्याप शिफारशींची औपचारिक अंमलबजावणी केलेली नाही. दरम्यान, सीमावादामुळे बेळगाव हे गेल्या काही वर्षांपासून हिंसक संघर्षाचे केंद्र बनले आहे.
२००४ मध्ये, महाराष्ट्र सरकारने सुप्रीम कोर्टात संपर्क साधला आणि घटनेच्या कलम १३१ (B) नुसार-ज्याने सर्वोच्च न्यायालयाला राज्यांमधील किंवा राज्ये आणि केंद्र यांच्यातील विवादांचे मूळ अधिकार क्षेत्र दिलेले आहे-विवाद सोडवण्याची मागणी केली. कर्नाटकातील ८१४गावांवर आपला दावा मांडला.
हे प्रकरणही सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. २०१९ मध्ये, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याचिका जलद गतीने करण्यासाठी राज्याच्या प्रयत्नांवर देखरेख ठेवण्यासाठी छगन भुजबळ आणि एकनाथ शिंदे या दोन मंत्र्यांची नियुक्ती केली होती.आता परत एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उभय राज्यातील सीमा प्रश्न सोडविण्यासाठी वरिष्ठ विधीज्ञ बैद्यानाथ व चंद्रकांत पाटील आणि शंभूराज देसाई यांची नियुक्ती केली आहे.



# वाचाल तर वाचाल

आधुनिक केसरी

आज इंटरनेट. मोबाईलच्या जमान्यात नव्या पिढीने  पुस्तकांशी पाठ फिरवली आहे.आज मोबाईल वर अनेक ॲप आहेत ज्यामध्ये इंटरनेटवर सहजपणे उपलब्ध होत आहेत. मग पुस्तक कशाला वाचायचे असं आजच्या पिढीला वाटत आहे.हल्ली पुस्तक वाचनाचा कल कमी झाला आहे.जो तो मोबाईलमध्ये गुरफटला आहे. आपल्याला जर ज्ञान  व शब्दसंग्रह वाढवायचा असेल तर प्रत्येकाने पुस्तकाशी मैत्री केली पाहिजे.रोज काही ना वाचले पाहिजे.आज सर्वत्र क्रांती झालेली आहे. सगंळ जग बदललंय  अनेक गोष्टी आपल्याला सहजपणे उपलब्ध होत आहेत. काही गोष्टी आपल्या हातातून निसटून जात आहे.ती म्हणजे पुस्तकं वाचनाची आवड कमी होत चालली आहे. केवळ पैसा कमावणे हेच आपले  केवळ उद्दीष्ट नाही. पैशापेक्षाही मोठी संपत्ती या जगात आहे.ती म्हणजे पुस्तकं ज्याच्याकडे जास्त पुस्तके तोच खरा श्रीमंत होत. ज्याच्याकडे



ज्ञानाचा खजिना आहे.पुस्तकांचा खजिना आहे.असा माणूस श्रीमंत समजलयला हवा. पुस्तकासारखा या जगात आपला मित्र नाही. पुस्तकामुळे आपलं आयुष्य बदलायला वेळ लागत नाही.एखादं सुंदर पुस्तक आपलं जिवन नक्कीच बदलू शकते .ग्रंथासारखा गुरू नाही.पुस्तकं हीच आपली मार्गदर्शक आहेत. आपल्या मनाला व मेंदूला दिशा देण्याचे काम पुस्तक करत असतात. आपल्याला जिवनात आंनद, समाधान, ज्ञान व विचार करण्याची क्षमता हवी असेल तर आयुष्यात पुस्तक वाचनाशिवाय पर्याय नाही.प्रत्येकाने पुस्तक वाचायला शिकले पाहिजे.पुस्तके आपली सोबती आहे. प्रत्येकाने विविध पुस्तके वाचायला हवीच. आपल्या व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीत पुस्तकांचा वाटा मोलाचा आहे. कांदबर्या, कथासंग्रह, आत्मचरीत्र, विविध दैनिक, मासिके, साप्ताहिक जे मिळेल ते वाचा पण वाचा पुस्तके आवर्जून विकत घेऊन वाचली पाहिजे.कारण त्याशिवाय त्यांचे महत्त्व कळत नाही.लहाणपी आपण शाळेत जायचो कोर्या करकरीत पुस्तकांचा सुगंध दरवळायचा हा आनंद काही वेगळाच होता.तो शब्दांत सांगणे शक्य नाही.परंतु आपणही पुस्तकांचा आनंद घेउन वाचनाचा आनंद घेतला पाहिजे.आपल्या घरात महागडे शोकेश नसले तरी चालेल परंतु पुस्तकांचे कपाट हे मात्र नक्की असले पाहिजे. खरोखर पुस्तकं वाचली पाहीजेत ती काळाची गरज आहे.उद्याचे उज्वल भवितव्य घडवण्यासाठी पुस्तक वाचनाशिवाय पर्याय नाही.त्यासाठी वाचाल तर वाचाल  हा मुलमंत्र ध्यानात घ्यायला हवा.

संतोष दत्तू शिंदे
जि. अहमदनगर, मो.७७२१०४५८४५

# गमावलेला आत्मसन्मान परत मिळवण्याचे मार्ग

आधुनिक केसरी

'द ब्लूएस्ट आय' या कादंबरीत टोनी मॉरिसनने आपल्या रूपावर खुश नसलेल्या एका मुलीबद्दल लिहिले होते. तिला निळे डोळे हवे होते, पण तिचे डोळे काळे होते. सुखी कुटुंब मिळावे अशी तिची इच्छा होती, परंतु तिचे कुटुंब आनंदी नव्हते. तिच्या कुटुंबातील सदस्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे तिचा कमकुवत स्वाभिमान आणखी क्षीण झाला. आपल्यापैकी काहींच्या वाट्याला घरी, शाळेत, साथीदार आणि कुटुंबीयांमध्ये असेच दुःखी क्षण आले असतील. आपण इतके चांगले नाहीत, या खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवला. आपल्यापैकी काहींनी चांगली सुरुवात केली असेल, परंतु नंतर आलेल्या अपयशांमुळे त्यांचा स्वाभिमान दुखावला गेला असेल. आताही आपल्यापैकी काहींच्या जीवनात सर्व काही आपल्या बाजूने घडत असेल, परंतु आपण स्वतःशी सतत नकारात्मक बोलणे हानिकारक ठरू शकते. कारण काहीही असो, पण काही उपायांनी आत्मसन्मानाचा अभाव दूर करता येतो. पहिले म्हणजे प्रतिकूलता व लोकांना आपण बळी पडत आहोत, असा जितका विचार कराल तितके कमकुवत होत जाल. आपला भूतकाळ एक स्वप्न म्हणून पाहा आणि भविष्याचा मजबुतीने व निर्भयपणे सामना करा.दुसरे म्हणजे तुमच्या मनावरील ओझे काढून टाका. स्वतःला कमकुवत लेखता तेव्हा अपयशाची उदाहरणे तुम्हाला हानिकारक



भावनिक भार देतात. आत्मविश्वास वाढवण्यासाठी ते सोडणे चांगले. यासाठी ध्यानाची मदत घ्या. ध्यानाद्वारे स्वाभिमान वाढवणे हे वास्तव आहे. तुम्ही स्वतःशी सामान्य असता तेव्हा तुमचा आत्मविश्वास वाढतो. तिसरे म्हणजे नकारात्मक विचारांपासून दूर राहणे. आपल्या कमतरतेबद्दल दुःख करण्याऐवजी त्या सुधारण्याचा संकल्प करा. अंतर्गत नकारात्मक संवादात गुंतण्याऐवजी ते अदृश्य होईपर्यंत त्यांचे निरीक्षण करा. चौथे म्हणजे इतरांशी स्पर्धा करण्याची प्रवृत्ती, ती टाळा. ही प्रवृत्ती आपल्याला ना उपयुक्त बनवते आणि ना आनंदी राहू देते. आपण स्वतःशी स्पर्धा केली तर आपण केवळ अधिक उपयुक्तच नाही, तर मजबूत आत्मसन्मानदेखील प्राप्त करतो.

**श्री श्री रविशंकर**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दप्तरमुक्त शनिवार



कस्तुरी कुलकर्णी
संपर्क क्र. 9595860570

आधुनिक केसरी

**आज आमच्या जि प प्रा शाळा गारज , ता वैजापूरच्या शाळेत दप्तर मुक्त शाळा उपक्रमात क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले .. खरतर ही क्षेत्रभेट अचानकच ठरली . त्याला कारण म्हणजे , आम्ही दोघी शाळेत पोहोचलो तेव्हा रोज मुलांनी गजबजलेली , मुलांच्या आवाजाने , खेळण्याने नटणारी शाळा आज मात्र फारच शांत होती . कारण शाळेत एकही मुलं नव्हते . थंडीमुळे कदाचित त्यांचे आवरलेच नसेल . मग हळूहळू काही मुलं आली , त्यांना आम्ही इतर मुलांना बोलावण्यास पाठवले ..**

तर परत आलेला एक मुलगा म्हणाला , ' टीचर तो ओम सोमवारपासून येणार आहे शाळेत , तो बाजारात भाजी विकतोय ..' हे ऐकल्यावर अचानक डोक्यात आले, तो येत नाहीय शाळेत तर आपणच शाळा त्याच्याकडे घेऊन जाऊयात.. त्यानिमित्ताने मुलांना बाजार क्षेत्रभेट घडवून आणता येईल..

तसं पाहिलं, तर खेड्यातल्या मुलांसाठी ' आठवडी बाजार ' ही काही नवीन गोष्ट नाही.. पण आपल्याला माहीत असणारी गोष्ट जर वेगळ्या दृष्टीने पाहिली तर काहीतरी नवीन नक्कीच शिकायला मिळतं, असं मला वाटतं.

मग काय, आम्ही दोघी आणि आमच्या अंगणवाडी ताई निघालो बाजाराला.. मग मुलंही एक एक नवीन काही बोलू लागली.. एक जण म्हणाला , अहो टीचर , पण आपण बाजारासाठी पिशव्यांच नाही घेतल्या.

कोणी म्हणे , ' आम्ही पैसेच नाही घेतले ..' एक ना अनेक .. मुलं आपली बोलतच होती. पण नंतर त्यांना आम्ही सांगितले, अरे आज बाजार करायला नाही तर बाजाराचे निरीक्षण करायला, तिथल्या विक्रेत्यांशी संवाद साधायला, आणि त्यांची मुलाखत घ्यायला आपण जात आहोत.. मग बाजारात जाईपर्यंत आम्ही स्वच्छता फेरीचेही आयोजन केले . त्यात मुलांनी, ' एक दिवस - कोरडा पाळा ' ही घोषणा जेव्हा दिली तेव्हा गावातील काही महिलांनीही मुलांना प्रश्न विचारले .. अरे कोणता दिवस कोरडा पाळायचा रे ..? मग मुलं गोंधळली आणि आम्हाला विचारु लागली, टीचर कोणता दिवस ..? मग त्यावेळी घोषणेचे शब्द बदलून, ' शनिवारचा दिवस कोरडा पाळा - स्वच्छता पाळा - रोगराई टाळा ' असे झाले . आणि त्या महिलांचेही समाधान झाले. मग आम्ही बाजारात पोहोचलो. तिकडे सगळ्यात पहिले



कासारचे दुकान लागले. मग एक गरम मसालेवाला आपले मसाले विकत होता. मुलांनी त्याच्याकडील मसाल्यांची नावे सांगितली. जी नावे माहीत नव्हती, त्या मसाल्यांची ओळख त्याने मुलांना करून दिली. त्यानेही काही प्रश्न मुलांना विचारले. त्याच्याकडचे 10 ग्राम चे माप मुलांनी हाताळून पाहिले. यात आणखी एक नवीन गोष्ट घडली.. शहरातच लहानाची मोठी झालेल्या मला, मुलांमुळे आज एक नवीन शब्द समजला.. मसाल्याच्या दुकानात असताना एक मुलगा ते हौरी आहे असे म्हणाला, तेव्हा तिळाला ' हौरी ' असेही म्हणतात हे मला तर आजच समजले. तिथून पुढे आम्ही गेलो , हरमाल वाल्याकडे . तिथे मुलांनी अनेक वस्तूंची किंमत त्याला विचारली .

त्याच्याकडे असणारे शालेय साहित्य, गृहपयोगी साहित्य , अशा वस्तूंची यादी तिथल्या तिथे मुलांनी बनवली . आणि विशेष म्हणजे , पॅडची किंमत विचारताना , 70 रु चा पॅड 50 लाच द्या म्हणजे आम्ही सगळेजण पॅड घेऊ असा कबुली जबाबही मुलांनी त्याच्याकडून घेतला. यातून भाव कसा करावा याचे प्रत्यक्ष उदाहरण मुलांना मिळाले. त्या दुकानाच्या बाजूलाच मुलांच्या आवडीचे दुकान होते .. कशाचे म्हणून काय विचारताय ..? अहो, 'भेळ -भत्ताचे ...! ' त्याच्याशी संवाद साधताना तर एक दोन मुलांनी बोलता बोलताच त्याच्या शेव वर डल्ला मारला.. मग त्याच्याकडील तिखट - गोड पदार्थांची यादी करत करत आम्ही पोहोचलो एका भाजीवाल्याकडे.. त्या भाजीवाल्यालाही मुलांनी अनेक प्रश्न विचारले. आमच्या काही मुलींनी तर पेन आणि कागद सोबत घेतला होता , त्यावर भाज्या व इतर वस्तूंची नावे आणि त्यांच्या किमतीही त्यांनी लिहून घेतल्या.

कटलरी, साड्या, फळं, पालेभाज्या अशा अनेक विक्रेत्यांकडे जाऊन मुलांनी त्यांच्याशी संवाद साधला आणि मग आम्ही शाळेकडे परत फिरलो. पण परत आल्यावर काही मुली म्हणाल्या अहो टीचर, त्या बाकीच्या भाजीवाल्यांकडे आपण गेलीच नाही, आम्हाला त्यांनाही बोलायचं होतं .. त्यावेळी, मुलांच्या उत्सुकतेचे कौतुक वाटले . शाळेत परत आल्यावर, यश तर म्हणाला , टीचर आता आपली आनंदनगरी कधी होणार आहे हो ..? आणि मग थोडा विचार करून पुन्हा तोच बोलला, टीचर ऊन पडल्यावर आणि टरबूज आल्यावरच घ्या हा आनंदनगरी.. एक मिनिटं मनात विचार आला, की असे का म्हणाला तो .. पण मग, लगेच लक्षात आले, की त्यांच्या शेतात टरबूज येतात ना .. !

पण , यशचे असा विचार करण्याचे कौतुक वाटले .. कारण नुसती आठवडी बाजाराला भेट दिली तर मुलांनी अनेक नवीन विचार आपल्या मनात आणले, त्यानुसार पुढची प्लॅनिंगही केली .. आणि त्यावेळी काय धमाल करणार, आणि आज बाजारात किती मजा आली याची सगळी माहितीवजा कॅसेटच पुन्हा पुन्हा वाजवली मुलांनी .. याच खरंच मनापासून कौतुक वाटत होतं .

चला तर मग .. तुम्हीही या कधीतरी अशा मस्त , रंगीत संगीत आठवडी बाजाराची सफर करून .. आणि मग लिहा तुमचेही छानसे अनुभव.. तोवर .. घ्या आमच्या अनुभव शिदोरीचा आस्वाद ..बाजाराची सफर करून , घाला तुमच्याही मनाला साद.

# हेडफोनमुळे बहिरेपणाचा धोका



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कानाला हेडफोन लावून गाणे ऐकणारे तरुण हे महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये, वाहनांमध्ये हमखास दिसतात. आजकाल मोबाइलप्रमाणेच सध्या हेडफोनही तरुणांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. वाहनांमधून प्रवास करताना, गाडी चालवताना, जेवताना इतकेच काय तर अगदी अभ्यास करतानासुद्धा हेडफोनवर गाणी ऐकण्याचा मोह तरुणांना आवरत नाही. पण या सवयीमुळे अनेक शारीरिक, मानसिक आजार तर जडतातच, पण त्याचबरोबर यामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याचेही समोर आले आहे. याचा परिणाम अनेकदा हा छंदच जीवघेणा ठरत आहे. कानाला हेडफोन लावून रस्ता, रेल्वे लाईन ओलांडणे, वाहन चालवताना कानाला हेडफोन लावणे हे अपघाताला निमंत्रण ठरत आहे. बहिरेपणा, मानसिक आजार याचबरोबर जीवावर बेतणे यानुसारख्या गोष्टी या हेडफोनच्या वापरामुळे घडत आहेत.**

हेडफोन आणि कर्कश आवाजातील कार्यक्रमांमुळे जगभरातील सुमारे एक अब्ज तरुणांना बहिरेपणाचा धोका असल्याचा निष्कर्ष नवीन अभ्यासात नोंदविण्यात आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या ( डब्ल्यूएचओ ) नेत्तृत्वाखालील अभ्यासातील निष्कर्ष बीएमजे ग्लोबल हेल्थ या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. या अभ्यासात गेल्या 20 वर्षांमध्ये इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच आणि रशियन भाषेमध्ये झालेल्या 33 संशोधनातील माहितीचा विचार करण्यात आला आहे.

या अभ्यासात असे आढळले की, जगभरातील 24 टक्के तरुणांमध्ये मोबाईल फोनचे हेडफोन वापरताना त्यांच्या ऐकण्याच्या पद्धती ही र्शवणसंस्थेसाठी हानीकारण होत्या. 48 टक्के तरुण जे मनोरंजनाच्या ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक आवाजाच्या संपर्कात आले होते. सर्व अभ्यास एकत्र केले तर जगभरात 6 लाख 70 हजार ते 1.35 अब्ज तरुणांना हेडफोन आणि गोंगाटाच्या संपर्कात आल्यामुळे श्रवणशक्ती बाबत धोका असल्याचे स्पष्ट झाले.

या अभ्यासाबाबत दक्षिण कॅरोलिना मेडिकल युनिव्हर्सिटीच्या ऑडिओलॉजिस्ट लॉरेन डिलार्ड यांनी म्हटले आहे की, हेडफोन्सवरून ऐकू येण्याचा धोका कमी करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आवाज कमी ठेवणे आणि हेडफोनचा वापर कमी करणे हा आहे, पण अलिकडे लोकांना खूप मोठया आवाजात संगीत आवडते. मात्र बहिरेपणाचा त्रास होवू नयेसाठी तरुणी हेडफोन वापरताना आवाजाची पातळी तपासणीसाठी स्मार्टफोनवरील अँपचा वापर करावा. हेडफोनचा वापर आणि गोंगाटाच्या ठिकाणी तुम्ही सातत्याने वावरत असाल तर उत्तारवयात याचा मोठा परिणाम होवू शकतो. यावर तोडगा काढण्यासाठी सर्वच देशातील सरकारने आवाजाच्या पातळीबाबत डब्ल्यूएचओच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे, असे आवाहनही डिलार्ड यांनी केले आहे.

डब्ल्यूएचओच्या माहितीनुसार जगातील एकूण लोकसंख्येच्या पाच टक्क्यांहून अधिक लोकांच्या श्रवणशक्तीवर परिणाम झाला आहे. जगभरात 2050 पर्यंत ही लोकसंख्या 700 दशलक्षांपर्यंत वाढेल, असेही नमूद करण्यात आले आहे.

शालेय विद्यार्थ्यांपासून महाविद्यालयातील तरुणांपर्यंत सर्वांना अशाप्रकारची सवय लागली आहे. कुटुंबातील कमी होत चाललेला संवाद आणि त्यामुळे मुलांमध्ये वाढलेला एकाकीपणा या सतत कानाला हेडफोन लावण्याच्या सवयीला कारणीभूत गोष्टी आहेत, असे म्हणायला हवे. भावनांना वाट करून देण्यासाठीचे माध्यम म्हणून मुले याकडे सहज वळतात, असे काही मानसोपचार तज्ज्ञांनी मत व्यक्त केले आहे. प्रत्यक्ष भेटून बोलण्यापेक्षा मोबाइलवर बोलणे सुरू झाल्याने अनेकदा मोबाइलवर तासभरही संवाद चालतो. त्यात एकावेळी अनेक कामे करण्याच्या सोयीमुळे हे हेडफोन गरजेचे बनले आहेत. दररोज दोन दोन तासाहून अधिक हेडफोनचा वापर करणे शारीरिक आणि मानसिक आजाराला निमंत्रण असल्याचेही मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. कमी ऐकू येणे, दुसऱ्याने उच्चारलेला शब्द व्यवस्थित ऐकू न येणे, अशा तक्रारी असणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. तासंतास फोनवर बोलल्यामुळे किंवा जास्त काळ डीजेच्या आवाजाच्या संपर्कात राहिल्यामुळे कानांच्या पेशींची कार्यक्षमता कमी झाल्यास कायमचा बहिरेपणा येऊ शकतो,असे डॉक्टर मंडळी सांगताना दिसतात. याचा मानसिक इफेक्टही मोठा धोकादायक आहे.

हेडफोनचा वापर हा आता सवयीचा भाग बनल्याचे तरुण सांगत असले तरी पण हेडफोनवर गाणे ऐकताना जीवनातील परिस्थितीशी समान असे गाणे ऐकून भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जातो. पण या स्वप्नाच्या विश्वातून बाहेर येऊन वास्तविकतेचे भान ठेवणे गरजेचे आहे. गाडी चालवताना किंवा रस्त्यावरून चालताना मोबाइल आणि हेडफोनद्वारे गाणे ऐकत असल्याने सभोवतालच्या जगाचा विसर पडतो. त्यामुळे ही सवय अपघातास कारणीभूत ठरते. म्हणून किमान गाडी चालवताना किंवा रस्त्यावर चालताना तरी याचा वापर टाळणे आवश्यक आहे. हेडफोन हे अपघातांबरोबरच पिढीला भावनिक शून्यतेकडे नेण्याचे काम करतात. त्यामुळे हेडफोनचा वापर कमी प्रमाणात केला गेला पाहिजे.

# थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस

आधुनिक केसरी

शाम ठाणेदार

थोर शास्त्रज्ञ डॉ ( सर ) जगदीशचंद्र बोस यांचा आज स्मृतिदिन. डॉ जगदीशचंद्र बोस हे भारताचे पहिले जीव शास्त्रज्ञ, भौतिक शास्त्रज्ञ आणि वनस्पती शास्त्रज्ञ होते. जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींमध्येही प्राण्यांप्रमाणे संवेदना असतात हे प्रयोगाद्वारे सिद्ध केले. उण, पाऊस , थंडी, प्रकाश, ध्वनी यांमुळे प्राण्यांप्रमाणे वनस्पतींमध्येही संवेदना निर्माण होतात हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी सेस्कोग्राफ नावाचे यंत्र बनवले. या यंत्राने वनस्पतीची संवेदना दहा हजार पटीने मोठी करून बघता येणे शक्य झाले. सेस्कोग्राफ हे यंत्र वनस्पती शास्त्रासाठी वरदान ठरले. जगदीशचंद्र बोस यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ रोजी बंगालमधील आताच्या बांगलादेशमधील मैमनसिंग येथे झाला. त्यांचे वडील भगवानसिंग बोस हे सरकारी अधिकारी होते. लहानपणापासून जगदीशचंद्र बोस यांना आजूबाजूचा निसर्ग पाहायचे, त्याचे निरीक्षण करण्याची आवड होती. झाडे, फुले, पक्षी, प्राणी, फुलपाखरे पाहणे हा त्यांचा आवडता छंद होता. जगदीशचंद्र बोस यांचे प्राथमिक शिक्षण गावातल्या शाळेतच झाले. कलकत्ता येथील सेंट झेव्हीयर कॉलेजमधून इंटरमिडियट होऊन, कलकत्ता युनिव्हर्सिटीतुन भौतिकशास्त्र, डॉक्टरकीचा अभ्यास करून इंग्लंडच्या ख्रायीस्टचर्च महाविद्यालयातुन भौतिकी, रसायन, वनस्पती शास्त्र आणि निसर्ग शास्त्र यांचा अभ्यास करून ते भारतात परतले. भारतात परतल्यावर कलकत्याच्या प्रेसिडेंटी कॉलेजमध्ये भौतिकीच्या प्राध्यापक पदावर रुजू झाले आहे ( १८८५ ) या पदावर प्राध्यापक म्हणून रुजू होणारे ते पहिले भारतीय असल्याने त्यांना वर्णभेदाला तोंड द्यावे लागले ; पण काही वर्षानंतर त्यांची योग्यता ओळखल्यावर असामान्य शास्त्रज्ञात त्यांची गणना होऊ लागली. १८८५ ते १८९५ या काळात भौतिक शास्त्र शिकवत असताना त्यांनी विद्युत शक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरंगाचा शोध लावून त्यांनी बॅटरी बनवली. या शोधाची कीर्ती जगभर पसरली. विद्युत शक्तीवरील संशोधनानंतर ते वनस्पतीशास्त्रकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तुंमधील साम्य आणि भेद यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी या विषयावर लिहिलेल्या निबंधाना आणि व्याख्यानांना सुरवातीला व्यपाक मान्यता मात्र मिळाली नाही. १९०१ व १९०४ मध्ये त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीला या विषयावर सादर केलेला निबंध स्वीकारण्यात आले नाही त्याचे अंशतः कारण म्हणजे त्यांनी या विषयाचे तत्वज्ञानात्मक विवरण केले होते तथापि वनस्पतींच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी योजलेल्या वनस्पतींची अतिसूक्ष्म हालचालींची नोंद करणाऱ्या अतिशय संवेदनशील स्वयंचलित उपकरणा बद्दल आणि या उपकरणाच्या साहाय्याने त्यांनी विविध उद्दीपनांमुळे होणाऱ्या वनस्पतीतील सूक्ष्म बदलाविषयी सातत्याने जमा केलेल्या माहितीबद्दल त्यांची कीर्ती जगभर पसरली. वनस्पतीच्या वाढीचे दहा हजार पट विवर्धन करू शकणारे सेस्कोग्राफ हे स्वयंचलित उपकरण त्यांनी तयार केले होते. या उपकरणाच्या साहाय्याने बोस यांनी वनस्पतींनाही संवेदनग्रहण क्षमता असे प्रयोगाद्वारे सिद्ध करून दाखवले.

वनस्पती अन्न ग्रहण करतात, रात्री लवकर झोपतात, सकाळी लवकर उठतात, प्राण्यांप्रमाणे वनस्पतींचाही जन्म विकास आणि मृत्यू होतो. हे जगदीशचंद्र बोस यांनी सिद्ध केले. वनस्पती शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी क्रेस्कोग्राफ, रेझोनंट रेकॉर्डर, असेंलेटिंग रेकॉर्डर, कंपाउंड लेव्हलर, बॅसलिंग अप्रेट्स इत्यादी उपकरणे त्यांनी तयार केली. १९२० साली त्यांना रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळाली. १९३६ साली त्यांनी कलकत्त्यात बोस इन्स्टिट्यूट रिसर्चची स्थापना केली. संस्थेने मुखपत्रही सुरू केले. जगदीशचंद्र बोस यांनी इरिटोबॅलिटी ऑफ प्लॅन्टस, इलेक्ट्रोफिजीओलॉजी ऑफ प्लांटस, ट्रॅफिक मूव्हमेंट अँड ग्रोथ ऑफ प्लांटस, द नर्व्हस मेकॅनिझम ऑफ प्लांटस, प्लँटस रिस्पॉन्स १९०६, द फिजिओलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, मोटार मकॅनिजम ऑफ प्लांटस, रिस्पॉन्सेस इन द लिविंग अँड नॉन लिविंग १९०६, लाईफ मूव्हमेंट ऑफ पप्लांटस ( भाग १ ते ४ ) इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. केम्ब्रिज विद्यापीठाने त्यांना१८९६ साली सन्मानीय डी. एससी ही पदवी दिली. द रॉयल सोसायटीने १९२० साली त्यांनी सदस्यत्व बहाल केले. ब्रिटिश सरकारने १९१७ साली त्यांना नाईट हा किताब देऊन गौरविले. जगदीशचंद्र बोस अतिशय देशाभिमानी शास्त्रज्ञ होते. भारतीयांनी आपल्या महान सांस्कृतिक परंपरेत वैज्ञानिक संशोधन करून भर घालावी. अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी कलकत्ता विद्यापीठात आणि बोस रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये संशोधनाला अतिशय प्रोत्साहन दिले. जगदीशचंद्र बोस यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी २३ नोव्हेंबर १९३७ रोजी बंगालमधील आता बिहारमधील गिरीडी येथे निधन झाले.

# सुकलेला चाफा



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**माणसाचे मन फार विचित्र आहे. त्याने एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की त्याला तेच हवे असते. त्याला प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक गोष्टीत तोच भास होऊ लागतो. कृष्णाच्या वियोगाने वेडी झालेली राधा ही सर्वत्र कृष्णाला शोधू लागली. कृष्णाच्या बासरीचा भास तिला व्याकुळ करू लागला. 'माझा कृष्ण मला भेटावा' असा स्वरविलाप वेडी मीरा करू लागली. भक्तीत गुंतलेली मीरा आपला कृष्ण प्रत्येक गोष्टीत पाहू लागली. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी तिला कृष्ण दिसू लागला.**

प्रीती आणि भक्ती यामध्ये गुंतलेल्या राधा आणि मीरा कृष्णाला विसरू शकल्या नाही. खांडेकर म्हणतात, " प्रीती आणि भीती यांचे मार्ग जरी वेगळे असले तरी शेवटी त्यांची फलश्रुती सारखीच" या भक्तीत अन् प्रीतीत गुंतलेल्या बड्या लोकांच्या काहाण्या तर जाऊ द्या; परंतु आपल्या सामान्य माणसाचे मनही कधी जळत्या आगेसम वेडे बावरे असते. मनात तरळणारे विचार हे काही केल्या पुसून टाकता येत नाही. आठवणींचा वारा लागला की ती वेडे बावरे होऊन आणखीनच वेगाने पेट घेते. त्या आठवणींना विजवता येत नाही तसेच, काहीसे मंजिरीचे देवदत्ताच्या विराहने झाले. प्रत्येक ठिकाणी ती त्याला पाहू लागली. त्याचे शब्द तिच्या अंधारल्या मनात चांदण्याचे काम करत होते. तेवढेच तो चांदवा तिला सुखवून जायचा आणि दुसऱ्या क्षणी तिला त्याच्या आठवणींच्या किर्र आवाजाचा त्रास व्हायचा. त्या गर्द रात्रीतून बाहेर पडणे त्या क्षणाला फार कठीण असते. पण म्हणतात ना रात्र कितीही गर्द असली तरी तिला पहाटेची किनार असतेच. तसेच या आठवणींची लाट किनाऱ्याच्या भेटीला आल्यापासून राहणार नाही. विरहाचा त्रास संपला की भेटीचा गारवा मनाला अलवार स्पर्श करतो. माणसाच्या जीवनात सुगंधाचे ही स्थान वेगळे आहे. आणि त्या गंधाची प्रीती ही अगदी निराळी मनाला भावणारी, प्रत्येक मनावर राज्य करणारी अशी आहे. प्रेम आणि भक्ती या सुगंधा शिवाय अपूर्णच त्यांना पूर्णत्व येत ते ह्याच फुलांच्या गंधाने मग या प्रीती आणि भक्तीमध्ये वेगवेगळ्या गंध हा मनाला सुखावणारा असतो. प्रत्येकाला कोणता तरी गंध हा प्रिय असतो त्याची ती प्रीती असते. म्हणून या प्रीतीची तुलना दुसऱ्या कोणाशी करणे अशक्यच आहे. मलाही चाफ्याचा गंध प्रिय आहे. चाफा फुलला नाही म्हणून बरेच दिवस त्याच्या उमलण्याच्या प्रतीक्षेत गेले. भुकेलेला माणूस ताटावर बसला की जेवण सावकाश वाढणाऱ्या माणसाचा ज्याप्रमाणे राग येतो, त्याचप्रमाणे मनाला चाफ्याचा राग आला. इतका अबोला त्यांनी धरला तरी कशासाठी हा विचार मनात येताच कवी बी यांच्या ओळी आठवल्या.

**"चाफा बोलेना चाफा चालेना चाफा खंत करी काही केल्या फुलेना!"**

आपली प्रीत दूर असतानाही असे काव्य कसे सुचले असावे असा प्रश्न समोर उभा राहिला. पण मला



नेहमीच वाटते निव्वळ प्रितीची कल्पना करून या कविता रचल्या गेल्या असाव्या. नाहीतर विरहाचे गीत आसवांच्या संगतीशिवाय कसे बरे स्फुरतील पण चाफेच्या प्रीत मनात असतानाही मन गंधाविना जेव्हा होरपळत होते, तेव्हा मोगरा फुलला. मोगराच्या गंधाने ते मन सुकावले, त्यात रमले परंतु; ते चाफ्याला विसरले नाही. चाफा फुलतात ते त्या गंधाला बिलगले. आपलेही जीवन असेच असते. जीवनाच्या वाटा तुडवताना प्रीतीची वेल अलवार बहरते या वेलीवरची विरहाची पाने गळून गेली की पुन्हा मिलनाच्या ओढीने नवी पालवी जन्म घेते. देवदत्ताची भेट ही मंजिरीसाठी अशाच मिलन गंधाचे काम करून गेली. त्याच्या शब्दांमध्ये ती आकंठ बुडाली. या भेटीत झालेले मनाचे मिलन विरहाची ज्वाला शांत करणारे ठरले. चाफ्याच्या प्रेमासाठी व्याकुळ झालेले मन मला कळाले, पण तेच दूर दुसऱ्या बाजूला चाफ्याने काढलेला प्रीतीचा वनवास कुणाला कळाला. आता तो काही वेगळा सांगणे गरजेचे नाही. मंजिरीच्या मनाच्या झालेल्या वेदनेचा दाह देवदत्ताने ही सोसला होता. प्रीती ही चाफ्यासम असते ती दुरून मोहन वाटली तरी जवळून एकसारखा सुवास घेतल्याशिवाय मनाची शांती होत नाही. गंध आणि प्रीती या एकाच वेलीवर बहरणाऱ्या दोन गोष्टी आहेत. त्या मनाला अनंत काळ सुखवत राहतात. स्पर्शाच्या मोहाविन मनाने गुंफलेले प्रीतीचे जाळी किती मोहक असते. त्यात स्वतःहून अडकावेसे वाटते शेवटी प्रीती ही गंधावाचून अपूर्णच राहते.

# माता भगिनींची इज्जत: घरीदारी संडास !



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतात मोठमोठ्या देवालयापेक्षा शौचालयांची अत्याधिक आवश्यकता भासत आहे. आज भारतात कित्येक स्त्री-पुरुषांना असुविधेमुळे उघड्यावर शौचास बसावे लागते. त्यामुळे रोगराई मोठ्या प्रणावर फैलावते. जेंडर बजेटमध्ये लाखोंची तरतूद होऊनही कधी प्रशासनाची टाळाटाळ तर कधी वित्तीय संकटामुळे लोक शौचालय बांधत नाहीत. ही महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारतासाठी दुर्दैवी बाब ती कोणती असू शकेल? संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर केला आहे. जगभर या दिनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे.**

महाराष्ट्रात सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी गडांगडावर शौचालय बांधले होते. महाराष्ट्र संताची भूमी आहे. अनेक थोर महात्मे महाराष्ट्रात घडून गेले आहेत. त्यापैकीच एक संतश्रेष्ठ गाडगेबाबा होते. स्वच्छतेचे महत्व सर्वप्रथम त्यांनी समाजाला पटवून दिले. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन रस्त्यावरची घाण साफ केली. रात्री किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील धूळ, घाण, कचरा साफ केले. ते खरे स्वच्छतादूत व स्वच्छतेचे पुजारी होते. बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींचा हा लेख जरूर वाचा... संपादक._ आज पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया नियोजित व अनियोजित क्षेत्रात काम करू लागल्या आहेत. मंदिरे, धार्मिक स्थळे, मार्केट, विविध वस्तू विक्रीचे रोड मार्केट, बाजार अगदी, रांगोळीपासून ते अनेकविध वस्तू विक्रीसाठी स्त्रिया घरापासून तास न् तास दूर राहतात. तेव्हा मलमूत्र विसर्जनाची गरज भागणार कशी? किती व कशी सोसायची ही हालअपेष्टा? ती मूलभूत गरजांपासून इतकी उपेक्षितच असू नये. निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांसाठी प्रसाधनगृह हेसुद्धा स्वच्छ भारत अभियानात आवर्जून समाविष्ट झाले पाहिजे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन आणि ते दाबून, कुचंबून ठेवणे, आरोग्यास किती हानीकारक? स्त्रियांचे आरोग्य व शारीरिक सुदृढता महत्त्वाची, तसेच मानसिक कुचंबणा टाळणे मोलाचे म्हणून स्त्रियांसाठी घरीदारी प्रसाधनगृहे हवीच आहेत. ती तशी सार्वत्रिक हवी. सार्वजनिक व कौटुंबिक स्तरावर प्रथम प्राधान्याने प्रसाधनगृहे उभारावीत. त्यातच शौचालय नसल्याने स्त्रियांच्या मासिक धर्माच्या काळात किती हाल होतात? ते विचारूच नका. म्हणे, आपण आता प्रगतशील अर्थव्यवस्थेच्या टप्प्यावर आहोत. प्रगत, आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, विकासाचे टप्पे पार करताना स्त्री प्रसाधनगृहाचा विषय इतका गंभीर असू नये, ही थोडी थोडकीच लज्जास्पद बाब असेल का?

विश्व मलमूत्र विसर्जन व्यवस्थापन दिन- जागतिक शौचालय दिन ही नैसर्गिक गरज आहे. आरोग्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व वारंवार अधोरेखित केले जाते; पण ती उघड्यावर करण्याची क्रिया नसून त्यासाठी प्रसाधनगृह हवे, हे मान्य असूनही त्याबाबत प्रचंड अशी उपेक्षा व स्त्री प्रसाधन गृहाकडे तर नको तितके दुर्लक्ष होत आहे. शासनाने स्वच्छ भारत अभियान सुरू केले; मात्र माणसाच्या मलमूत्र विसर्जनासाठी बंदिस्त सोय असण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शरीर जीवनशैलीची ही अविभाज्य अशी प्रक्रिया होय. तो संवेदनशील असा विषय आहे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन करणे सार्वजनिक अनारोग्याला, साथीच्या रोगांना निमंत्रणच जणू काही! हा दिन मलमूत्र विसर्जनाचे व्यवस्थापन व देशापुढील आरोग्याशी निगडीत आहे. त्याबद्दलची अनास्था, उपेक्षा आणि योग्य ती दखल घेण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष, अशी स्थिती आज आपल्या समाजात विशेषतः ग्रामीण निम्नशहरी भागात आहे, हे दुर्दैव होय. १९ नोव्हेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघातर्फे जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर करण्यात आला आहे. या दिवशी स्वच्छतेचे महत्त्व पटवून घ्यावे व द्यावे. नैसर्गिक गरज भागविली जावी, म्हणून या दिनाचे प्रयोजन करण्यात आले. विश्व प्रसाधनगृह दिन हा आपल्याला आपल्या जीवनात स्वच्छता किती महत्त्वाची आहे, याची आठवण करून देतो. आपल्या परिसरातील स्वच्छता व्यवस्था सुधारण्याचे अनेक मार्ग आहेत आणि आपण त्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जागतिक शौचालय दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसे आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की ज्यांना अस्वच्छ सांडपाणी व्यवस्थेचे विविध धोके माहित नाहीत त्यांना सांगणे आवश्यक आहे. मानवी कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून त्यातून कोणतेही आजार होऊ नयेत. मानवी कचऱ्याचे कंपोस्ट खत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण कचऱ्यामुळे अनेक गुंतागुंती निर्माण होतात. या दिवसांत ग्रामीण भागात राहणाऱ्या अनेक लोकांपर्यंत पोहोचण्याची आणि त्यांना शौचालये आणि स्नानगृहे बांधण्यासाठी मदत करण्याची गरज आहे. योग्य स्वच्छता व्यवस्थेशिवाय असे लाखो मार्ग आहेत, ज्याद्वारे रोग पसरू शकतात. जागतिक शौचालय दिनाचे मुख्य उद्दिष्ट आहे, की या रोगांवर कोणत्या मार्गांनी सामना केला जाऊ शकतो, यावर चर्चा करणे होय. भारतात मोठमोठ्या देवालयापेक्षा शौचालयांची अत्याधिक आवश्यकता भासत आहे. आज भारतात कित्येक स्त्री-पुरुषांना असुविधेमुळे उघड्यावर शौचास बसावे लागते. त्यामुळे रोगराई मोठ्या प्रणावर फैलावते. जेंडर बजेटमध्ये लाखोंची तरतूद होऊनही कधी प्रशासनाची टाळाटाळ तर कधी वित्तीय संकटामुळे लोक शौचालय बांधत नाहीत. ही महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारतासाठी दुर्दैवी बाब ती कोणती असू शकेल? सुज्ञ पालकाने आपली लाडकी मुलगी संडास नसलेल्या घरी मुळीच देऊ नये. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर केला आहे. जगभर या दिनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. महाराष्ट्रात सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी गडांगडावर शौचालय बांधले होते. महाराष्ट्र संताची भूमी आहे. अनेक थोर महात्मे महाराष्ट्रात घडून

**(विश्व शौचालय दिन सप्ताह विशेष)**

गेले आहेत. त्यापैकीच एक संतश्रेष्ठ गाडगेबाबा होते. स्वच्छतेचे महत्व सर्वप्रथम त्यांनी समाजाला पटवून दिले. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन रस्त्यावरची घाण साफ केली. रात्री किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील धूळ, घाण, कचरा साफ केले. ते खरे स्वच्छतादूत व स्वच्छतेचे पुजारी होते. निरोगी आरोग्याचा कानमंत्र म्हणजे स्वच्छ अशा बंदिस्त संडासमध्ये मलमूत्र विसर्जनाची व्यवस्था असणे होय. परंतु सुमारे ४० टक्के लोकांना शौचालयाची सुविधा नसणे वा त्याचा वापर न करणे अशी स्थिती आहे. सरकारी आकडेवारीनुसार देशात ११० दशलक्ष शौचालयांची गरज आहे. ग्रामीण निम्नशहरी भाग, झोपडपट्टी, जुन्या वसाहती, डोंगर भागात वाड्या-वस्त्या वगैरेमध्ये शौचालयाची उपलब्धता नाही. उघड्यावर शौचास बसणे, हाच शिरस्ता आजतागायत चालू आहे. पाणंद, ओढा, नदी, टेकडी, झाडे-झुडपे वगैरेचा आधार घेत स्त्रिया मलमूत्र विसर्जन करतात. पुरुष समोर दिसला, की उभे राहणे हेच अपरिहार्य कर्म झाले आहे. स्त्रियांसाठी शौचालय नसणे, ही अत्यंत अन्यायकारक अनारोग्यी बाब होय. शहरी भागात कॉमन शौचालयाची व्यवस्था असते, तीही अपुरी व अस्वच्छच. त्यातच स्त्रियांच्या स्वभावानुसार त्या रांगेत उभे राहण्यास टाळाटाळ करतात. शिवाय सकाळी कामाची गडबड असते. मग ही नैसर्गिक गरज कुचंबून मारली जाते. त्यात आजारग्रस्त स्त्रिया, गरोदर माता, तरुण मुली यांची तर फारच गैरसोय होत आहे. ग्रामीण परिसरांमध्ये पारंपारिक मलनिस्सारण पद्धतीकरिता होणारी मोठी भांडवली गुंतवणूक, न परवडणारी देखभाल, व्यवस्थापन खर्च, पाण्याचा अपुरा पुरवठा, विखुरलेल्या वस्त्या व गावे आदींमुळे शक्य होत नाही. शहरी भागात प्रसाधनगृहे वाढत असूनही अक्षम्य असे दुर्लक्ष होत आहे, तेही विशेषतः स्त्रियांसाठी प्रसाधनगृह उभारणीमध्ये. व्यक्तिगत आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता, सामाजिक आत्मसन्मान रक्षण व प्रगतिशील राष्ट्र म्हणवून घेण्याच्या या टप्प्यावर तर सर्वांसाठी प्रसाधनगृहे ही अत्यावश्यक गरज मानली जावी. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीमुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या, या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था आदी या समानतेचा लढा देताना शासनावर दबाव टाकण्याचा म्हणूनच प्रयत्न करतात. त्यामध्ये वास्तविक स्त्री प्रसाधनगृहाची नितांत आवश्यकता, हा विषय प्रथम प्राधान्याने घ्यायला हवा. शिवाय जनजागृती, समाजप्रबोधन, कौटुंबिक समुपदेशन, स्त्रीपुरुष समानता विषयक कायदे आणण्याचा लढा देताना स्त्रियांचे मूळ दैनंदिन जीवन जगण्याचे प्रश्न महत्त्वाचे मानून प्राधान्य द्यायला हवे. समानतेचा नारा देताना मुळातच स्त्री जीवन सुसह्य, सोसीक व सुखावह कसे होईल, हे पाहायला हवे. त्या दृष्टीने स्त्री प्रसाधनगृह हा प्रश्न मोलाचा आहे, याचे भान त्या चळवळीने व शासनानेसुद्धा ठेवावे, ही अपेक्षा!

# प्रतापगड म्हणजे 'शौर्य किल्ला'




आधुनिक केसरी

प्रतापगड म्हणजे 'शौर्य किल्ला' हा पश्चिम भारतातील महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यात असलेला एक मोठा डोंगरी किल्ला आहे. 1659 मध्ये झालेल्या प्रतापगडाच्या लढाईमुळे किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे. हा किल्ला आता एक लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. शिवाजी महाराजांनी जावळी जिंकली जिथे प्रतापगड आहे तिथे फक्त एक डोंगर होते ज्याचे नाव भोरप्या चा डोंगर किंवा ढोरप्याचा डोंगर हे होते. शिवाजी महाराजांनी या किल्ल्याचे बांधकामाची सुरुवात 1656 ला केली. शिवाजी महाराजांच्या सांगण्यावरून मोरोपंत त्रिंबक पिंगळे यांनी 1656 ते 1658 या किल्ल्याचे पूर्ण बांधकाम झाले. प्रतापगड किल्ला शिवाजी महाराजांनी 1656 ते 1658 या काळात बांधला होता. इतिहासकारांच्या मते किल्ल्याचे मूळ नाव धोरप्या किंवा भोरप्या असे होते. 1659 च्या उन्हाळ्यात, अफझलखानने मराठा प्रदेश पायदळी तुडवला. छत्रपती शिवाजी महाराजांना प्रतापगडावरून बाहेर काढण्यासाठी सपाट जमिनीवर लढाई करण्यासाठी मंदिरे उध्वस्त केली. पूर्वीच्या लढाईत अफझलखानाने विश्वासघाताने मारलेल्या आपल्या भावाचा बदला घेण्याची इच्छा असूनही छत्रपती शिवाजी महाराज मात्र सहज आकर्षित झाले नाही. मोठ्या प्रादेशिक सत्तेसोबत मराठ्यांनी कधीही लक्षणीय लष्करी सहभाग जिंकला नव्हता आणि छत्रपती शिवाजी महाराजांना हे ठाऊक होते. अफझलखान 20,000 हून अधिक घोडदळ, 15,000 पायदळ, 1,500 शिपाई, 80 तोफा, 1,200 उंट आणि 85 हत्तींसह प्रतापगडावर पोहोचला. छत्रपती शिवाजी महाराजांकडे सुमारे 6,000 हलके घोडदळ, 3,000 हलके पायदळ आणि 4,000 राखीव पायदळ होते. मराठ्यांना प्रतापगडाचा एकमात्र फायदा होता, की त्याभोवती घनदाट जंगले आणि उंच टेकड्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज आणि अफजल खाना मध्ये 9 नोव्हेंबर 1659 रोजी भेटण्याचे मान्य केले, परंतु दोघांनीही एकमेकांवर विश्वास ठेवला नाही. दोघांनी लपवून ठेवलेली शस्त्रे आणि अंगरक्षक जवळ ठेवले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या तंबूत भेटले. दोघे जण एकमेकांजवळ येताच अफजलखानाने छत्रपती शिवाजी महाराजांना मिठी मारायला गेला. असे करता करता अफजलखानाने आपल्या कोटच्या आतून चाकू काढला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाठीत वार करण्याचा प्रयत्न केला. तथापि, छत्रपती शिवाजी महाराज यांनी कपड्यांखाली चिलखत घातले होते, ज्यामुळे त्यांचे विश्वासघातकी हल्ल्यापासून संरक्षण झाले होते. मग छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या हातात लपवलेल्या वाघनखांनी अफजल खानाचे पोट फाडून काढले. आपल्यावर हल्ला झाल्याचे आपल्या माणसांना ओरडून अफजल खान दुःखाने पळून गेला. बॉडीगार्ड्सच्या दोन गटांनी एकमेकांना गुंतवून ठेवले आणि अफजलखानाच्या सेनापतींना स्वतःच्या मार्गावर परत जाण्यासाठी वेळ विकत घेतला. पण नंतर संभाजी कावजी अफझलखानच्या मागे गेला कारण त्याला त्याच्या नोकरांनी पळवून नेले होते. त्याने अफजल खानाला पकडले आणि त्याचा शिरच्छेद केला आणि त्याचे डोके नंतर विजय म्हणून जिजामाता कडे पाठवले गेले.

**क्रमशः**

# वेटरला कथेचा नायक करून हे पडद्यामागील जग लिहावंसं वाटलं : डॉ. रमेश रावळकर



आधुनिक केसरी

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा ह.ना. आपटे पुरस्कार आणि जे.के. जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा जे.के. जाधव सर्वात्कृष्ट कादंबरी पुरस्कार हा डॉ. रमेश रावळकर लिखित 'टिश्यूपेपर' या कादंबरीला जाहीर झाला. त्यानिमित्त त्यांची घेण्यात आलेली मुलाखत.**

**प्रश्न : बालपण, शालेय शिक्षण कसे झाले?**
**उत्तर :** जालना जिल्ह्यातील कडपिंपळगावं (ता. जाफ्राबाद) हे माझं गावं. आई-वडील दोघेही शेतकरी. शेतकरी कुटुंबात जन्म झालेला असल्यामुळे संपूर्णपणे निसर्गावर अवलंबून राहायला लागायचं. पाऊस जास्त आला, तर हाताशी मजुरी असायची, हा सगळा प्रकार होता. 8 वी पर्यंतचं शिक्षण धाड या गावी झालं.9 वी आणि 10 वीचं शिक्षण जालना जिल्ह्यातील 'माहोरा' येथे झालं आणि पुढचा प्रवास औरंगाबादपासून सुरू झाला.

**प्रश्न : वाङ्मयीन प्रवासाला सुरुवात कशी झाली?**
**उत्तर :** माझं गावं हे 80 टक्के वारकऱ्यांचं गावंआहे. एकादशीचा कार्यक्रम गावात कुठेही असला तेव्हा आम्ही भजनाला असायचो. माझी आई जात्यावर दळण दळताना (लोकसाहित्य) ओव्या गात म्हणायची, हा माझ्यावर चांगला संस्कार होत होता. मी 10 वीला असताना माझ्या शेजारी सुभाष कड हा कवी राहायचा. त्यांच्या कविता माझ्या वाचनामध्ये आल्या, त्यावेळी लिहिण्याचा सहज प्रयत्न केला होता.
'मी असे एक गुराखी, जणू गुरांचा पाठराखी कळपात एकेकाळी गाय, जशी रोज दूध देई मज माझी माय' ही पहिली रचना लिहिल्यानंतर सुभाष कड यांनी प्रोत्साहन दिले, वाचन वाढवायला सांगितले व खऱ्या अर्थाने इथून वाङ्मयीन प्रवासाला सुरुवात झाली.

**प्रश्न : लेखक व्हाल असा कधी विचार केला होता का?**
**उत्तर :** 10 वी झाल्यानंतर जामनेरवरून पळून औरंगाबादला आलो. हॉटेलमध्ये काम करून शिक्षण घेता येतं, हा विचार मनात आला होता. वाचनाची आवडही निर्माण झाली होती. अधूनमधून लेखकांची पुस्तके मी वाचत होतो, त्यात मांडगूळकरांचं 'माणदेशी माणसं', आनंद यादव यांची 'मातीखालची माती', दादा गोरेंचा 'अंगठा', 'कोसळ', रा.रं. बोरोडे यांची काही पुस्तके वाचली होती. सुरुवातीला मी हॉटेलच्या कविता लिहिल्या होत्या. त्या श्रीकांत उमरीकरांनी 'ग्रंथसखा'मध्ये प्रकाशित केल्या होत्या. त्या प्रकाशित झाल्यानंतर काही तरी वेगळं लिहितोयं, असं म्हणत अनेक मान्यवरांचे फोन आले. हॉटेलमध्ये काम करीत असताना हॉटेलच्या पडद्यामागे एक जग आहे, हे बघायला मिळालं. हॉटेलच्या वेटरला कथेचा नायक करून हे पडद्यामागील जग लिहावंसं वाटलं आणि तिथून हा प्रवास सुरू झाला.

**प्रश्न : 'टीश्यूपेपर' का लिहावीशी वाटली?**
**उत्तर :** 11 वी पासून मी हॉटेलमध्ये काम करीत होतो. एम.ए. मराठी विवेकानंद महाविद्यालयात करीत असताना हॉटेलच्या जीवनावरील काही पुस्तकं वाचनात आलेली होती. यावर विचार केला असता, मी जे जगतोय ते यात नाहीच. बऱ्याच वर्षांपासून काम करीत असल्यामुळे हॉटेलचे अनुभव पाठीशी होते. हळूहळू मी 'टीश्यूपेपर' लिहायला लागलो होतो.

**प्रश्न : 'टीश्यूपेपर'बद्दल एखादा आठवणीतला महत्त्वाचा क्षण कोणता?**
**उत्तर :** 'टीश्यूपेपर' कादंबरीमध्ये अर्जुन हा कथेचा नायक असतो. अर्जुनचे शिक्षण झाल्यानंतर त्याला एका वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्त्वावर प्राध्यापकाची नोकरी लागते. महाविद्यालयातले तास दुपारपर्यंत असल्याकारणाने संध्याकाळी हॉटेलमध्ये काम करत असत. विनाअनुदानित महाविद्यालय असल्याकारणाने मिळणारं वेतन हे पुरेसं नव्हतं. एके दिवशी हॉटेलच्या लॉनमध्ये कथेच्या नायकाच्या वाटेला चार-पाच टेबल येतात. अचानकपणे तीन-चार तरूण मुले हे अर्जुनच्या टेबलवर येऊन बसतात. त्यांची ऑर्डर मिळाल्यानंतर अर्जुन त्यांना बिअर घेऊन गेला. जे तरूण मुलं ग्राहक म्हणून हॉटेलमध्ये आले होते, ते अर्जुनचे विद्यार्थी होते. यावेळी अर्जून इतका खजील होतो, की आता यांना काय बोलू? शिक्षक वेगळ्या भूमिकेत आहे, पोशाखात आहे, तेही बिअर बारमध्ये सर्व्हिस देतोय, हा एक धक्काच होता. हा प्रसंग मला नमूद करावासा वाटतोय.

**प्रश्न : वरील घटनेमध्ये जिथे एका शिक्षकाची इभ्रत गेलेली आहे. विद्यार्थ्यांच्या मनात असलेल्या प्रतिमेला धक्का पोहोचलाय. या गोष्टी कशा सोडून द्यायच्या असतात? यातून कसं ओव्हरकम करायचं असतं, जे तुम्ही केलंत?**
**उत्तर :** जेव्हा मी औरंगाबादला यायचो तेव्हा माझी आई अशी म्हणायची, की असं कोणतं काम करू नको, जेणेकरून आम्हाला आमच्या पायाच्या नखांने माती उकरावी लागेल. प्रत्येकाच्या आई-वडीलांनी प्रत्येकावर संस्कार केलेले असतात. हा एक भाग आहे. दुसरी गोष्ट, जेव्हा तुम्ही स्वतःला शिक्षण म्हणून स्वीकारता, तेव्हा तो विद्यार्थ्यांना ज्ञानाची शिदोरी देत असतो. या सर्व गोष्टी स्वीकारताना समोर एखादी गोष्ट घडत असेल, शिक्षक म्हणून तुम्ही विद्यार्थ्यांकडे कोणत्या नजरेने पाहता, हा भाग महत्त्वाचा आहे आणि आपला विद्यार्थी जर वाममार्गाला लागत असेल, तर त्याला त्या गोष्टींपासून परावृत्त करता येतं, हा या गोष्टीमागचा महत्त्वाचा उद्देश आहे.

**प्रश्न : 'टीश्यूपेपर'मध्ये कथेचा नायक अर्जुन संवादाच्या केंद्रस्थानी आहे. वाचकाला अर्जूनविषयी प्रचंड आस्था व सहानुभूती वाटते, याकडे तुम्ही कसं बघता?**
**उत्तर :** ज्या वाचकाने ही कादंबरी वाचलीयं, त्याने अगोदर किंवा नंतर मनोगत वाचलेलेच आहे. मनोगतामध्ये लेखकाचा जीवनपट येतो. मनोगत वाचल्यानंतर प्रत्येक वाचकाला असं वाटायला लागलं, की अर्जून दुसरा कोणी नसून खुद्द लेखकच आहे. लेखकाने हे संपूर्ण भोगलंय आणि तो अर्जुनच्या रुपाने मांडतोय. अर्जूनमध्ये प्रत्येक वाचक मला बघतोय. त्यामुळे वाचकाला अर्जुनविषयी प्रचंड आस्था वाटू लागली. प्रत्येक वाचकानेन अर्जुनमध्ये लेखकाला शोधू नये, त्याला एक तटस्थ भूमिकाच्या पात्रात ठेवा. वाचकांना हे माहित आहे, की मी आजसुद्धा विनाअनुदानित महाविद्यालयात शिकवतोय. वाचकाने माझ्या परिस्थितीला समोर ठेवून 'टीश्यूपेपर'चं मूल्यमापन करू नये. वाचक, अभ्यासक, परीक्षक म्हणून तुम्हाला 'टीश्यूपेपर'बद्दल काय वाटतं, ते मांडा. मला सहानुभूतीचं यश नकोय.

**प्रश्न : हॉटेल म्हटलं की खाण्यापिण्याची चंगळ असते. मग तुम्हालाही वेगवेगळे पदार्थ चाखायला मिळत असतील?**
**उत्तर :** हॉटेलमधील वेटर, हेल्पर सकाळी 10.30 वाजता कामावर जायचे, त्यावेळी त्यांना चहा, नाश्ता काहीही मिळायचा नाही. जेवणही तीन वाजल्याशिवाय कुणाला करायची परवानगी नव्हती. अशा वेळी रात्री चोरून ठेवलेल्या रोट्या हेल्पर लाल मिरचीच्या भुकटीसोबत किचनमध्ये चोरून खाताना दिसायचे. त्यावेळी माझा जीव पिळवटून निघायचा आणि मी आतल्या आत अस्वस्थ व्हायचो.

**प्रश्न : 'टिश्यूपेपर'ने बारबालांच्या प्रश्नांना वाचा फोडली. बारबालांचे प्रश्न सुटले आहेत का? शासनाने याकडे कसे पाहावे?**
उत्तर : बारबालांचे प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत. 'टिश्यूपेपर'ने यावर फक्त कादंबरीच्या माध्यमातून आवाज उठविलेला आहे. हॉटेल मालकाला, ग्राहकाला 'बारबाला' एका विशिष्ट वयापर्यंतचं हवी असते. त्यांच्या पाठीमागे कुटुंब नसतं. परिस्थिती त्यांना 'बारबाला' व्यवसाय स्वीकारायला भाग पाडते. तारूण्य संपल्यानंतर 'बारबालां'च्या आयुष्याचं काय? हा सगळ्यात मोठा प्रश्न आहे. अनेक बारबाला अत्याचाराला बळी पडतात. उतारवयात सामाजिक संस्था, शासन यांनी काही तरी केले पाहिजे, जेणेकरून उतारवयात त्यांच्या उपजिविकेची व्यवस्था होईल. नसता अनेक बारबाला आहेत, त्यांना आत्महत्या कराव्या लागल्यात.
शरीर विक्री करणाऱ्या महिलांची व्यवस्था केली जाऊ शकते, तर बारबालांची सुद्धा करायला हवी. सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शासनाने माणूस म्हणून त्यांच्याकडे बघायला पाहिजे. कुठलीही स्त्री न्यायालयाची, हॉटेलची पायरी चढत नाही. तिच्यासमोर अशी काही परिस्थिती निर्माण केली जाते, की तिला ते केल्याशिवाय पर्याय नसतो. जीव महत्त्वाचा असतो, म्हणून ती तो पर्याय स्वीकारते आणि त्या दलदलीमध्ये फसते. त्या दलदलीमधून बाहेर पडणं तिला अशक्य होऊन जातं. म्हणून तरूण वयापर्यंत बारबालांचं आयुष्य ठिक वाटतं; पण उतारवयात तिला प्रचंड वेदना सोसावी लागते.

**प्रश्न : संपूर्ण कादंबरी वाचल्यानंतर कथेच्या नायकाचा 'संघर्ष अजून संपलेला नाही' हा सार निघतो. या कादंबरीचा भाग 2 केव्हा येईल?**
**उत्तर :** अर्जुन हा कथेचा नायक हॉटेलमध्ये काम करून शिकला. पुढे तो महाविद्यालयामध्ये गेला. संपूर्ण शिक्षण झाल्यानंतर नोकरीकरीता आर्थिक विवंचनेमुळे संस्थाचालकाची आर्थिक गरज पूर्ण करू शकला नाही आणि परत हॉटेलमध्ये आला. हा सर्व प्रवास आहे. शिक्षण हे माणसाला आत्मभान देत असेल, तर अर्जुनने वेगळा विचार केला नसेल का? तिथे अर्जुनचे वेगळे अनुभव असतील. अर्जुन ज्या क्षेत्रात गेला कदाचित ते कोचिंग क्लासेस असतील किंवा तो एखाद्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षक म्हणून लागला असेल. कारण तो एम.ए. झालेला होता. त्याला साहित्याची आवड सुद्धा होती. आदी अशा प्रकारचे अनुभव त्याच्या पाठीमागे नसतील कशावरून? कदाचित 'टीश्यूपेपर' भाग 2 येऊ शकेल; पण हॉटेल जगताच चित्रण करणारा तो भाग असेल, असे काहीही नाही.

**प्रश्न : 'टिश्यूपेपर' या कादंबरीला महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचा ह.ना. आपटे पुरस्कार जाहीर झाला. लेखकाची जबाबदारी निश्चितच वाढलेली आहे. लेखकाच्या यापुढील भूमिका आणि योजना कोणत्या?**
**उत्तर :** कुठलाही लेखक लिहून मोकळा होतो. त्याचे स्वागत समीक्षक, अभ्यासक, वाचक करीत असतात. 'टिश्यूपेपर'चे स्वागत अत्यंत उत्तम पद्धतीने झालेले आहे. पुण्यातील नामवंत संस्था 'राजहंस'ने ते प्रकाशित केलेले आहे, हे 'टिश्यूपेपर'चे पहिले यश होय. सर्वात अगोदर 'तिफन' या वाङ्मयीन चळवळीने 2021 मध्ये चर्चेतील पुस्तक म्हणून 'टिश्यूपेपर'ची निवड केली. हा 'टिश्यूपेपर'साठी पहिला पुरस्कार होता. त्याच्यानंतर नांदेडचा प्रसादबन पुरस्कार, दिवाकर चौधरी पुरस्कार, अक्षरबंधचा पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेचा बी. रघुनाथ पुरस्कार आदी पुरस्कार 'टिश्यूपेपर'ला मिळालेले आहेत. यामध्ये सर्वात महात्त्वाची गोष्ट अशी, की मसाप पुणे यांच्यावतीने सर्वोत्कृष्ट कादंबरी म्हणून दिला जाणारा ह.ना. आपटे पुरस्कार 'टिश्यूपेपर'ला जाहीर झाला, तेव्हा मला आनंद झाला. पुण्यासारख्या ठिकाणी लेखकाच्या लेखनाचे कौतुक होत असेल, तर मला वाटतं खऱ्या अर्थाने लेखकाची जबाबदारी वाढलेली आहे.

# अमृततुल्य



**प्रज्ञा पंडित, ठाणे**
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**हल्ली हा शब्द चहाच्या वर्णनासाठीच मुख्यत्वे वापरला जातो. अर्थात माझ्यासारख्या चहा प्रेमींना तो शब्द यथार्थच वाटेल परंतु तरीही माझ्या मते अमृत तुल्य म्हंटले की एकच पेय नजरेसमोर येते, ते म्हणजे उसाचा रस! गोड, मधुर, तृप्तीदायक असा उसाचा रस आरोग्यासाठी फारच गुणकारी आहे. सतत पित्ताने त्रासलेल्या आणि त्यामुळे इच्छा असूनही चमचमीत पदार्थ खाऊ न शकणाऱ्या पित्त प्रकृती धारकांना तर उसाचा रस हा वरदान आहे.**

मुळातच उसाचा रस पिण्यासाठी एक ठराविक माहोल तयार झालेला असतो. " चला आज आपण उसाचा रस प्यायला सगळेजण बाहेर जाऊया " असे प्लॅनिंग करून कधीच गुऱ्हाळ गाठले जात नाही. तर प्रवासात शिणल्यावर किंवा उन्हातान्हात बाजार हाट करताना बरीच खरेदी करून दमल्यावर क्षणभर वाईच जरा दम खाऊन तिथेच टेकून कोरडा पडलेला घसा शांत करावा या विचाराने हाफ/ फुल / किंवा हल्ली जंबो ग्लास ची ऑर्डर दिली जाते.
अगदी झट की पट मामला असतो बरं का ह्या गुऱ्हाळात. एकदम यू गये और यू आये टाईप! गेलं, ऑर्डर दिली, कूपन दिलं घेतलं की काही वेळात समोर निर्विकार चेहऱ्याचे तिथले दादा - भाऊ ग्लास समोर आणून ठेवतात. अगदी जन्मो जन्मीचे तहानलेले असल्यागत आपण ते घटाघट पितो. आधी एक फुल दोघांमध्ये बास या हिशोबाने घेतलेला एक फुल ग्लास रस दोघात मग कमी पडतो आणि पुन्हा एक ऑर्डर दिली जाते. रेंगाळले जात नाही की कधी कुठल्या रसवंती गृहात मोठमोठ्याने कोणी वाद घालतात, भांडणे करतायत असेही चित्र दिसत नाही. अहो गोड सुमधुर रस गळ्या पर्यंत प्यायल्यावर कोणाला तिथल्या तिथे आपसात कुठल्या गोष्टीवर वाद घालायचे आठवेल तरी का? ठाण्यात एकच रसवंती गृह आधीपासून माहीत होतं, जिल्हा परिषदेजवळ, मामलेदार मिसळ भागात असलेले हे गुऱ्हाळ लहानपणी आईबरोबर बाजारात गेल्यावर सगळी कामे झाली की हमखास गाठले जायचे. पुढे कॉलेज मधून येतानाही ते रस्त्यात लागायचे आणि खिशालाही परवडायचे त्यामुळे जाणे व्हायचेच. पण त्याशिवाय माहित असणारी आणि स्वच्छतेच्या विश्वासाची ठिकाणे म्हणजे चरई मधले आणि स्टेशन जवळ कुलकर्णी वडापावच्या बाजूलाच असलेले कानिफनाथ रसवंती गृह. आणि अगदी अलीकडचे म्हणजे गडकरी रस्त्याच्या पुढे कॉर्नरलाच असलेले रसवंती गृह! नाशिक, शिर्डी, कोल्हापूर भागात बरेचदा जाणे होते तिथेही प्रवासात हायवे नजिक असलेल्या रसवंती गृहात थांबून प्रवासाचा थकवा जाण्यासाठी रसाचा एक डोस घेतलाच जातो. वाढत्या महागाईचा परिणाम इथल्या दरावर होणे स्वाभाविक आहे...म्हणजे ज्यांनी आधी अवघे पन्नास पैसे दर बघितले आहेत त्यांना वीस रुपये दर बघून अवाक व्हायलाच होते पण त्यामुळे काही रसाशी असलेले नाते तोडून परत पाऊली कोणी जात नाही हेही खरेच. बदलत्या काळानुसार बऱ्याच गोष्टी बदलतायत, काहींची लोकप्रियता आपोआप कमी होतेय तर काहींची ती होण्याच्या मार्गावर आहे. ज्यांची ती होऊ नये असे वाटते त्यापैकीच एक असे हे पेय. सर्रास फ्रुटी,माझाची बॉक्स किंवा बॉटल मधली आणि इतर शित पेय रिचवणाऱ्या चिल्ल्या पिल्याना बघून मुद्दाम यावर आवर्जून लिहावेसे वाटले. आता हे वाचून,तुम्हालाही उसाच्या रसाची आठवण आली असणारच! कारण काही पदार्थ किंवा खाण्यापिण्याच्या जिन्नसामध्ये काही आठवणीही असतात, आणि आठवणी कधीच स्वस्त नसतात. त्यामुळेच असेल पण रसवंती गृह कधीच ओस पडलेले दिसत नाहीत आणि यातच सर्व आले. शुभं भवतू!



# ग्रामीण भागामध्ये वाजले शौचालयाचे तीनतेरा

## लोटा बहाद्दरांची संख्या वाढली कोणतेही पथक नसल्याचा परिणाम : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** जागतिक शैचालय दिन 19 नोव्हेंबर 21 ग्रामीण भागामध्ये शौच्छालय असुन सुद्धा वापर न करता लोक उघड्यावर बसत आहेत. तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गावा-गावानी शौच्छालय बांधलेले आहेत. मात्र याचा लोक उपयोग करत नसल्याचे पाहायला मिळत आहे.एकप्रकारे शौच्छालयाचे तिनतेराच वाजले आहेत.सोयगाव तालुक्यामध्ये कोणतेही पथक सक्रिय नसल्याने उघड्यावर बसणार्यांच्या संख्येत आधिकच वाढ होताना दिसत आहे. ज्यांनी संडास बांधले आहे, असे लोक उघड्यावर शौच्छास जात आहेत.

केंद्र सरकारने स्वच्छ भारत मिशन अभियाना अतंर्गत विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरीकांना शौच्छालय उभारणीसाठी मुबलक निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र या शौच्छालयाचा वापर न करता लाभार्थी ग्रामस्थ उघड्यावरच उघड्यावरच शौच्छास जात आसल्याने या स्वच्छता आभियानाचा गावोगाव केवळ फज्जा उडाला आहे.प्रत्येक गावात प्रशासनाकडुन देण्यात आलेल्या उदिष्टांची पुर्ती तर ग्रामपंचायत कडुन झाली.मात्र अधिकार्याकडुन व कर्मचार्याकडुन ग्रामस्थांमध्ये जनजागृती न झाल्याने अनेक नागरीकांमध्ये अद्याप देखिल शौच्छालयाबद्दल जनजागृती न झाल्याचे दिसुनयेत आहे. तसेच काही ठिकाणी पाण्या अभावी नागरीक बाहेर जात आसल्याचे म्हटले जाते. तालुक्यात गावामधील बंहुताश नागरीक हे घरामध्ये शौच्छालय आसुन देखिल याचा वापर न करता उघड्यावर जातात.त्यामुळे शौच्छालय केवळ शोभेची वस्तुच बनत आहे.तसेच काही शाळा,तलाठी कार्यालय,व ग्रामपंचायतीच्या शौच्छालयाची अवस्था बिकट झाली आहे.तर काहु ग्रामंपचायतीना आजुन शौच्छालयच उपलब्ध नाही.अनेक गावात पांणदच्या ठिकाणी ग्रामस्थ उघड्यावर शौचास जात आहेत.यामुळे साथीचे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.ग्रामीण भागातील जनतेमध्ये जनजागृतीचा अभाव दिसुन येत आहे.विशेष मोहीम राबवुन किंवा एखाद्या पथकाची नेमनुक करून ग्रामीण भागात जनजागृती करण्याची मागणी प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) सावळदबारा यांनी केली आहे.



गावातील पोलीस पाटील, सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य या बाबतीत लक्ष देण्याचे काम आहे .शौच्छालयाचे काम पुर्ण झाल्यामुळे आता गुडमार्निंग पथक कार्यान्वित नाही .सोयगाव तालुक्यातीत गावे व पाडेमिळुन 85 आसपास असुन ४५ ग्रामपंचायती आहेत . बेसलाईन अंर्तगत तालुकाभरामध्ये 4 ते 6 हजार शौच्छालय आहेत . याला आळा घालण्यासाठी तालुका स्तरावर पथक नेमलेले पाहीजे .

**सुनिल माकोंडे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष सावळदबारा .**

तालुक्यात पाण्या अभावी नागरिकांना बाहेर शौच्छास जावे लागते . त्यामुळे नगर पंचायत व ग्राम पंचायत च्या वतीने स्वच्छ भारत या योजनेतून नागरिकांसाठी सार्वजनिक सौच्यालाय बांधण्यात आले पाहिजे .

**-महेशसिँह ( सोनू ) ठाकूर, देव्हारी, ता .सोयगाव**



# बगडी येथे शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील बगडी येथील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या गोदावरी नदीकाठी असून नदीला येणाऱ्या पाण्यामुळे, तसेच गोदेचे बॅक वॉटर (फुगवट्यातील पाणी) सतत आसपासच्या परिसरात व रस्त्यावर पसरते. त्यामुळे शेतात जाण्याकरिता असलेला रस्ता वाहून जातो. सध्या देखील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ताच नाही. सध्या शेतात कापूस वेचणीसाठी आला आहे. त्यामुळे बगडी येथील महिलांना कापूस वेचणीसाठी थर्माकलच्या तराफ्याचा वापर करून पाण्यातून जीवघेणा प्रवास करीत शेत गाठावे लागत आहे. गोदावरी नदीच्या पाण्यातून तराफ्याद्वारे शेतात जाताना महिला. सोमवारी सकाळी हे चित्र पाहावयास मिळाले. सदरील समस्या कायमस्वरूपी असून बगडी येथील ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षी लोकसहभागातून येथे मुरूम टाकून तात्पुरता रस्ता तयार केला जातो. मात्र, गोदावरी नदीला येणाऱ्या पाण्याने हा रस्ता वाहून जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतीसाठी तराफ्याच्या साह्याने जीव मुठीत घेऊन पाण्यातून प्रवास करावा लागतो. तालुक्यातील अनेक गावे जायकवाडी धरणाच्या पाण्यामुळे पुनर्वसित झाली आहेत. या धरणाला सुमारे ५० वर्षे उलटून देखील धरणासाठी जमिनी घेतलेल्या गावातील लोकांना शासनाच्या वतीने मूलभूत सुविधा अद्यापही मिळाल्या नसून शेतकरी, ग्रामस्थांच्या या जीवघेण्या समस्येकडे प्रशासन व लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित केला जात आहे. सध्या काढणीला आलेला कापूस व तोडणीला आलेला ऊस रस्ता नसल्याने गोदावरीचे पाणी पार करून कसा काढायचा याची चिंता शेतकऱ्यांना लागली आहे. याठिकाणी पूल झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांची समस्या कायमस्वरूपी निकाली निघणार आहे. त्याकरिता प्रशासन व लोकप्रतिनिधींनी सकारात्मक दृष्टीने पाहणे गरजेचे आहे.

# टिळक स्मारक मंदिर पुणे येथे नाट्यमहोत्सवाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूरच्या वतीने "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक 23 से 25 नोव्हेंबर 2022 दरम्यान टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे रोज सायं 6.00 वाजता नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या नाट्य महोत्सवात दिनांक 23 नोव्हेंबर, 2022 रोजी "हर हर गंगे ही नृत्य नाटिका, इतोश्री आर्टस्, नागपुर द्वारे सादर होईल दिनांक 24 नोव्हेंबर, 2022 रोजी "द प्लॅन" नाटक 'स्नेह' पुणे द्वारे सादर होईल. दिनांक 25 नोव्हेंबर, 2022 रोजी "संगीत मत्स्यगंधा नाटक द मध्य प्रदेश एज्युकेशन सोसायटी, नागपूर द्वारे सादर होईल. आयोजनात श्रीमती चित्रा देशपांडे, संस्थापिका "आकारात पुणे यांचे मोलाचे स्थानिक सहकार्य लाभते आहे.

हर हर गंगे" (नृत्य नाटिका) भारता मधे प्राचीन काळापासून गंगा नदीला अनन्य साधारण महत्व प्राप्त आहे. परंतु गंगेचे स्त्रीपण, तिच्या बालवया पासून आणि आता त्या पर्यंतचा प्रवास गंगेच्या आत्मकथेतुन जन सामान्यांच्या पर्यंत पोहोचविण्याचा ह्या नाट्याद्वारे प्रयास करीत आहोत. नागपूर मधील सुप्रसिद्ध साहित्यिक सुप्रिया अय्यर यांनी गंगेची ही भावात्म नाट्यमय कहाणी लिहून काढली आणि नागपूर मधील सुप्रसिद्ध नाट्य कलावंत आणि "इतीश्री आर्टस्" च्या संस्थापिका श्रीमती दीपाली घोंगे व प्रियंका अभ्यंकर ह्यांचे दिग्दर्शनात ही कहाणी रंगमंचावर प्रस्तुत करीत आहे. या प्रसंगी सुप्रसिद्ध नृत्यांगना गुरु श्रीमती स्वाती दैठणकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित रहातील,

"नाटक भारतीय स्वतंत्र्य संग्राम दरम्यान महाराष्ट्रातील दोन महत्वपूर्ण घटना डब्ल्यू. सी. रेड व जैक्सन बघावर आधारीत आहे. या घटना चाफेकर वधु व अनंत कान्हेरे व अन्य क्रांतिकारकांनी कसे नियोजन केले व कुणापासुन प्रेरणा घेऊन मातृभूमीसाठी बलीदान दिले ह्याचा [इतिहास] प्लॅन नाटकात आहे. पुणे येथील सुप्रसिद्ध नाट्य लेखक दिग्दर्शक श्री. योगेश सोमण लिखित व श्री. योगेश सोमण व रश्मी देव दिग्दर्शित ""नाटक, पुणे चे सुप्रसिद्ध कलावंत सादर करतील प्रसंगी सुप्रसिद्ध सिने दिग्दर्शक व नाट्यकर्मी श्री. विवेक बाघ विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे.

“संगीत मत्स्य गंधा" - ह्या नाटकाचे कथानक महाभारतातील सम्राट शंतनू व सत्यवती यांच्या पौराणिक कथेवर आधारीत आहे. मध्य प्रदेश एज्युकेशन सोसायटी, नागपूर निर्मित व श्री. प्रभाकर देंगडी, दिग्दर्शित आणि सुप्रसिद्ध लेखक स्व. वसंत कानेटकर लिखित व पं जितेन्द्र अभिषेकी यांनी संगीतबद्ध केलेले सुप्रसिद्ध नाटक "संगीत मत्स्यगंधा" नागपूर येथील सुप्रसिद्ध कलावंत रंगमंचावर प्रस्तुत करतील ह्या नाट्य प्रस्तुति प्रसंगी सुप्रसिद्ध नाट्य अभिनेत्री श्रीमती मधुवंती दांडेकर उपस्थित रहतील.

हा नाट्य महोत्सव निःशुल्क असुन पुणेकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन तो यशस्वी करावा असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आदर्श बहिरगाव येथे एकाच दिवसात एक लाख 57 हजारांची करवसुली

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पंचायत समितीचे गटविकास अधीकारी यांनी जागतीक शौचालया दिनानिमीत्त राबविलेला "एक मुक्काम मुख्यालयाला" या उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील आदर्श बहिरगांव येथे विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे व ग्रामविकास अधिकारी योगेश धाटबळे यांच्या आवाहानाला प्रतिसाद देत ग्रामस्थांनी ईतर उपक्रमांबरोबर करवसुली मोहिमेत एकाच दिवसात एक लाख सत्तावन्न हजार रुपये कराचा भरणा केला.



# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघे ठार

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** पैठण तालुक्यातील निलजगाव ते पोरगाव रोडवरील पाडळी नजीक मोटारसायकल स्वारास अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जण जागीच ठार झाला असून एक जणाचा रात्री उशिरा उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे. इसारवाडी फाटा ते करमाड महामार्गावरील अपघातांची संख्या वाढत चालली आहे. निलजगाव ते पोरगाव रोडवरील पाडळी गावानजीक काल रात्री उशिरा अंदाजे ०९ वाजेच्या सुमारास पोरगाव तांडा येथुन मोटारसायकल वरुन बिडकिन कडे खाजगी कामानिमित्त येत असताना निलजगाव कडुन भरघाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वारास चिरडुन अज्ञात वाहनाने पळ काढला.धडकेत दुचाकी वरील आदर्श संजय राठोड, वय १२ वर्षे हा जागीच ठार झाला तर अजय ज्ञानेश्वर पवार, वय 30 वर्षे , दोघेही रा.पोरगाव तांडा यांचा दोघांना हि जीव गमावावा लागला. अजय पवार यास उपचारासाठी औरंगाबाद येथे हलविण्यात आला होता मात्र काल रात्री उशिरा मृत्युशी झुंज देत असताना प्राणज्योत मालवली.घटनास्थळी पोलिस कर्मचारी यांनी धाव घेत स्थानिक नागरिकांच्या मदतीने शासकिय रुग्णालय बिडकिन येथे दाखल करण्यात आले होते.सदरिल घटनेची बिडकिन पोलिस ठाणे येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असुन सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक संजिवन कदम हे पुढिल तपास करत आहेत.सदरिल घटनेने पोरगाव तांडा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# शिवस्मारकासाठी मनोज पवार यांच्याकडून 51 हजारांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरालगत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कनकावती नगर कारखाना येथे धर्मवीर मनोज पवार यांच्या शुभ हस्ते महाराजांची आरती करण्यात आली या वेळी स्मारकाच्या सुशोभी करण्यासाठी 51 हजार रुपयाची मतद करण्याचे अश्वासन दिले. या वेळी पवार बोलतांनी म्हणाले कि शिवाजी महाराजांनी अठरापगड जाती सोबत घेऊन स्वराज्य उभे केले व गडकिल्ले सुद्धा उभे केले.  अश्याच राज्यासाठी आपल ही देणं लागत म्हणून शिवरायांच्या पुतळ्याचा सुशोभीकरणासाठी माझ्याकडून जेवढे होईल तेवढी तोडकी मोडकी मदत करत आहे असे बोलून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी गंगाधर सूर्यवंशी, अभिजित देशमुख, नानासाहेब गायके, योगेश मैराळ, विनोद गायकवाड, रितेश देशमुख, भगवान गोंडे, घुमे नाना, अशोक पवार, ॲड. विजयसिंग मोहिते, सचिन वाळुंजे, अशोक डोंगरे, अनिकेत वाघ, कैलास निकम, राजू वाघ, अरुण शिंदे, गणेश जाधव, संदीप मोरे, विजय वाघ,रमेश सोनवणे,बाळू लोखंडे, कनकावती नगर कारखाना येथील इतर ग्रामस्थांची उपस्थीती होती.



# धारदार शस्त्र घेऊन चोरी करणारे पोलिसांच्या ताब्यात

## मोटरसायकलसह तीन घातक हत्यारे, मोबाईल मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पेट्रोल पंपावर घातक हत्यारानीशी जबरी चोरी करण्यासाठी आलेल्या धाडसाने दोन हात करीत एकाला पकडून ठेवण्यात पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांना यश आले त्यामुळे पोलिसांच्या हाती दरोडेखोर लागले आहेत. सदर घटना रात्री अडीच वाजेच्या सुमारास घडली. याबाबत साक्री पोलिस स्टेशनमधून मिळालेल्या माहितीनुसार २१ रोजी अडीच वाजेच्या सुमारास सुशांक सर्वो पेट्रोल पंप, देवनगर, साक्री येथे तीन इसम मोटरसायकलवरून आले. त्यांच्या हातात कुम्हाड आणि धारदार लोखंडी हत्यारे होती त्यांनी पेट्रोल कर्मचाऱ्यांवर थेट हल्ला करून हत्याराने मारहाण करीत एकाला जखमी केले. तसेच लॉकरची का प्रयत्न केला. यावेळी पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी त्यांचा प्रतिकार केला. त्यामुळे तिघे दरोडेखोर घाबरले आणि पळू लागले. त्यातील एकाला कर्मचाऱ्याने पकडून ठेवले तसेच घटनेची माहिती साक्री पोलिसांना देण्यात आली. पो.नि. आनंद कोकरे, पासई बी. बी. नन्हे, आर. व्ही. निकम, हे.कॉ. कांबळे , पो.ना. सावळे, पो.कॉ. तुषार जाधव, सुनिल अहिरे, चेतन आढारे, तसेच धुळे एलसीबी पथक घटनास्थळी रवाना झाले पोलिसांनी कर्मचाऱ्यांनी पकडलेल्या ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, आकाश शिवा थोरात, वय २०, रा. इच्छापूर, ता. साक्री असे त्याने नाव सांगितले. तसेच साथीदाराची जितेंद्र साथीदाराची माहिती दिली. त्यात जितेंद्र कैलास वेंदे व योगेश दगा मारनर, रा. इच्छापूर यांची माहिती दिली. त्यावरून एलसीबी पथकासह साक्री पोलिसांनी त्वरीत शोध घेतला आणि जितेंद्र कैलास वेंदे याला पकडले. त्याच्या ताब्यातून मोटरसायकल क्र. एमएच - १८ बीके -५३६८ आणि तीन घातक हत्यारे, मोबाईल असा मुद्देमाल ताब्यात घेतला. अवघ्या काही तासात



दरोडेखोरांना जेरबंद करण्यात साक्री पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलिस अधिक्षक किशोर काळे उपविभागीय पोलीस अधिकारी साक्री प्रदिप मैराळे, पो.नि. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साक्री पोलिस ठाण्याचे पो.नि. आनंद कोकरे पोसई नन्हे, निकम, कॉ. कांबळे पो.ना. सावळे पो.कॉ तुषार जाधव सुनिल अहिरे, चेतन आळारे आणि एलसीबी पथकाने केली आहे.



# साहित्यिकांनी समाजाला जागृत करावे : उदघाटक सुधाकर अडबाले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सध्याचे राजकीय वातावरण पक्षफोडीने गाजत आहे तर साहित्यक्षेत्रात विविध 'सवता सुभा' अन 'कंपुगीरी' माजत आहे... मात्र चंद्रपूर जिल्ह्याच्या साहित्य क्षेत्रात, जीवन गौरव मासिकप्रणित जीवन गौरव साहित्य परिवारचे समूह निर्माता तथा सहसंपादक गणेश कुंभारे व शब्दांकुर फाउंडेशनचे अध्यक्ष व सहसंपादक दुशांत निमकर या सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात काम करत असणाऱ्या 'कलंदर' व्यक्तींनी दोन्हीही संस्थाच्या संयुक्त विद्यमाने, गोंडपिपरी येथे ज्येष्ठ साहित्यिक उद्धव नारनवरे साहित्य मंच,धनोजे कुणबी समाज सभागृहात अतिशय नियोजनबद्धपणे विदर्भस्तरीय मराठी साहित्य संमेलन घडवून आणले...संमेलनाचे 'उदघाटन ते समारोप' हा प्रवास अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने चालला... मोठमोठ्या साहित्य संमेलनाचा ढिसाळपणा येथे मुळीच नव्हता, ही बाब विशेष कौतुकास्पद म्हणावी लागेल... उदघाटक म्हणून मा. सुधाकर अडबाले ( सरकार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ ) तर अध्यक्ष म्हणून कविमनाचे उपक्रमशील गट विकास अधिकारी मा.धनंजय साळवे हे उपस्थित होते. स्वागताध्यक्ष म्हणून मा.प्रा.संतोष बांदूरकर यांनी भूमिका बजावली.विशेष अतिथी म्हणून चेतनसिंग गौर नगरसेवक, श्रीकृष्ण अर्जुनकर( मु.का.अ.गृहलक्ष्मी महिला पतसंस्था गडचिरोली ) राजेश ठाकूर चामोर्शी,कवी,प्रवचनकार चेतन ठाकरे आरमोरी,सौ.रेखा कारेकर राज्य पुरस्कार प्राप्त मु.अ.तर विपुल साहित्य संपदा असलेले ज्येष्ठ साहित्यिक उद्धव नारनवरे यांचा 'साहित्य सेवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.यामध्ये साहित्य लेखन गौरव पुरस्कार देखील वितरित करण्यात आला. या प्रसंगी उदघाटक मा. सुधाकर अडबाले यांनी समाजाला जागरुक करण्याचे काम साहित्यिक करीत असतात त्यांनाही समाजाने जपावे असे मत मांडले तर अध्यक्ष धनंजय साळवे यांनी फक्त चित्रपट अभिनेता हाच सेलिब्रिटी नसावा,तर समाजाला सजग करणारा साहित्यिक हा समाजामध्ये सेलिब्रिटि म्हणून गणल्या जावा असे मत मांडले...

निमंत्रित कविच्या संमेलनाचे सूत्रसंचालन आपल्या खुमासदार शैलीत फिनिक्स साहित्य मंचचे अध्यक्ष तथा प्रख्यात कवी नरेश बोरीकर यांनी केले व रसिकांना खिळवून ठेवले.

निमंत्रित कवींच्या कविताद्वारे रसिकांनी 'कधी आसू तर कधी हासू 'अशी आंदोलने अनुभवली.

अहमदनगरचे कवी रज्जाक शेख यांनी रसिकांचे डोळे पाणावनारी जात्यामंधी बाप तुहा,पिठामंधी माय,ही रचना सादर केली.यवतमाळचे कवी विजय ढाले 'एकदा तरी बळीचे सरकार आले पाहिजे...' ही शेतकऱ्यांचा एल्गार पुकारणारी रचना सादर करून, रसिकांची भरभरून दाद मिळविली...

अहमदनगरचे ग्रामीणकवी आनंदा साळवे यांनी सासू सुनेचे नातेसंबंध आपल्या कवितेतून ग्रामीण शैलीत मांडले.

कवी अविनाश पोईनकर यांच्या 'जंगलनोंदी'तील आदिवासीच्या व्यथा वेदना रसिकांना अंतर्मुख करून गेल्या. हिवाळ्याच्या थंडीतही रसिकांना कवितांची भरभरून उब या विदर्भस्तरीय साहित्यसंमेलनाच्या माध्यमातून अनुभवता आली त्यानंतर नोंदणीकृत सहभागी ५० कवींचे कविसंमेलन मोठ्या थाटामाटात पार पडले.संमेलनाच्या यशस्वीतेसाठी झटनारे जीवन गौरव साहित्य परिवाराचे सौ.अर्चनाताई धोटे,विलास टिकले,उमेन्द्र बिसेन प्रा.भारत झाडे व शब्दांकुर फाऊंडेशनचे राजेश्वर अम्मावार,किशोर चलाख,राकेश शेंडे,सौ.उषा निमकर,वृषाली जोशी,संभाशिव गावंडे,तानाजी अल्लीवार, सुशांत मुनगंटीवार,विघ्नेश्वर देशमुख,उज्ज्वल त्रिनगरीवार, सचिन दळवी,अरुण कुत्तरमारे,शीतल आकोजवार,अमृता पोटदुखे,अश्रका कुमरे,रामेश्वर पातसे,राहुल पिंपळशेंडे,या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन अर्चना जिरकुंटावर यांनी तर आभार शब्दांकुर फाऊंडेशनचे सचिव राजेश्वर अम्मावार यांनी मानले. कार्यक्रमासाठी झुंगाजी कोरडे, देवानंद रामगिरकर,अरुण कुत्तरमारे, कोमरा अम्मावार यांच्या अविश्रांत परिश्रमामुळे हे कविसंमेलन यशस्वीपणे पार पडले.

# का.क. केंद्र बुद्धिबळ स्पर्धेत अर्श, जीया, सहज, वेदांत, स्वामिनी, उत्कर्ष विजेते

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कामगार कल्याण केंद्र कोतवालपुरा आणि सक्सेस चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत अर्श, जीया, सहज कौर, वेदांत, स्वामिनी आणि उत्कर्ष यांनी आपापल्या गटात विजेतेपद पटकावले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण रवींद्र सिंग जोहर, अनुप्रास बजाज, ब्राह्मण महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक, का. क. केंद्राचे संचालक योगेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश देशपांडे, अंजली पराडकर आदींनी परिश्रम घेतले.

**दुसरीपर्यंतचा गट : प्रथमः** अर्श सावंत, **द्वितीय :** आराध्य गोसावी आणि विहान गांधी, **तृतीय :** रेयांश साबू आणि अद्रीत सावंत.

**उत्तेजनार्थ :** सर्वेश काळे, आर्यमन माछर, रनक मुंदडा , झाएद डोकाडिया.

**मुली : प्रथम :** जीया बाहेती, **द्वितीय :** दिया सुराणा, **तृतीय :** आराध्या माछर.

**इयत्ता चौथीपर्यंतचा गट**

**मुली : प्रथम :** सहज कौर सरदार, **द्वितीय :** रावी छाबडा, **तृतीय :** नवीशा बेरिया, उत्तेजनार्थ : नायशा बेरिया.

**मुले : प्रथम :** वेदांत पोळ, **द्वितीय :** शिवांश खोसरे, **तृतीय :** युधान सोनवणे, **उत्तेजनार्थ :** शाहू पाटील, स्वराज कऱ्हाळे, शौर्या पाटील, जयवर्धन बजाज, श्रीरंग जाधव, शिवेन जेथलिया, आरव दुबे, अर्णव तोतला, नमीत सूर्यवंशी, विदूर माछर.

**इयत्ता सहावी पर्यंतचा गट :**

**मुली : प्रथम :** स्वामिनी गोसावी, **द्वितीय :** श्रेया पराडकर, **तृतीय :** मनलीन कौर सोखी

**मुले : प्रथम :** व्यंकटेश लहाने, **द्वितीय :** सयाजी पाटील, **तृतीय :** वीर सिंग, उत्तेजनार्थ : श्लोक बाहेती, श्रेयस इंगळे.


**इयत्ता सातवीपासून पुढचा गट**

**मुली : प्रथम :** तनू छाबडा, **द्वितीय :** अविका मंत्री. **मुले : प्रथम :** उत्कर्ष सांबरे, **द्वितीय :** ऋतुराज पाटील, **तृतीय :** पार्थ मेहेत्रे, **उत्तेजनार्थ :** आरुष अरोरा, अर्णव अरोरा.



# पुण्याच्या राम माने यांना यंदाचा सदाविजय आर्य कार्यकर्ता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** पुण्याच्या आंतरभारतीचे सचिव व नाशिक जिल्ह्याचे आंतरभारती दूत राम माने यांना यंदाचा कार्यकर्ता पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. या वर्षांपासून या पुरस्काराचे नाव सदाविजय आर्य कार्यकर्ता पुरस्कार असे राहील. उदगीर येथे होणाऱ्या स्नेहमीलन सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. राम माने यांचे पुण्याच्या कामातील योगदान आणि नाशिक येथे काम उभे रहावे यासाठी केलेली धडपड मुख्यताः ध्यानात घेण्यात आली. दर वर्षी महाराष्ट्रातुन एका कार्यकर्त्यांची निवड केली जाते. दि 20 नोव्हेंबर 22 रोजी सोलापूर येथे झालेल्या आंतर्भारतीच्या ट्रस्टी मंडळाने हा निर्णय घेतला असे कार्याध्यक्ष अमर हबीब यांनी स्पष्ट केले. आंतरभारतीचे अध्यक्ष पांडुरंग नाडकर्णी, उपाध्यक्ष संगीता देशमुख, सचिव डॉ डी एस कोरे, कोषाध्यक्ष डॉ. उमाकांत चनशेट्टी व सदस्या मनीषा आर्य यांनी राम माने यांचे अभिनंदन केले.




# सोन्याच्या भावातही कांदा रोपे मिळेना

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांची सोशल मीडियाच्या माध्यमातून रोपांची चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

रामभाऊ आवारे

**निफाड :** नाशिक जिल्ह्यासह निफाड, येवला, चांदवड, नांदगाव, सिन्नर, देवळा आदी तालुक्यातील कांद्याचे बियाणे जमिनीत टाकल्यानंतर उगवलीच नाही तसेच जी थोडाफार प्रमाणात परतीच्या पावसाच्या अगोदर टाकलेली बियाणे उगवली होती ती पूर्णता नष्ट झाली आहे. सद्यस्थितीत बहुतांश तालुक्यात नगदी चलन मिळवून देणाऱ्या कांदा पिकाच्या लागवडीचा मोसम सुरू झाला आहे. त्यातच कांद्याची रोपे मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी हतबल झाला आहे. अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांचे लाल, उन्हाळं कांदा रोपांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झालेले आहे, मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी टाकलेले बियाणे कांदा अतिवृष्टीच्या पावसाने जमिनीच्या वरच न आल्याने व जमिनीतच सडल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांची डोंगराळ भागात रोपांची शोधाशोध सुरू आहे, पण रोपे शोधण्यासाठी शेतकऱ्यांनी सोशल मिडियाचा जोरदार वापर सुरू आहे. पावसाच्या तडाख्यातुन वाचलेल्या व डोंगराळ भागातील वाचलेल्या कांदा रोपांना शेतकऱ्यांनी व्हाटस अप, फेसबुकवर टाकुन त्याखाली आपला मोबाईल नंबर टाकुन घरबसल्या गिऱ्हाईक शोधले आहेत ,त्यामुळे शेतकरी कांद्याच्या लागवडीकरीता थांबला आहे यावर्षी उन्हाळ कांद्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असले तरी शेतकरी मात्र कांद्यालाच पसंती देत आहे, तसेच अनेक शेतकऱ्यांनी यावर्षी मात्र रोपे नसल्याने कांद्याच्या लागवडीसाठी लाल, उन्हाळं कांद्याच्या रोपांची शोधाशोध करत असून मोठ्या प्रमाणावर रोपच खराब झालेली असतानाच किंचितच डोंगराळ, मुरमाड जमिनीवर रोपे वाचलेली रोपे ही महाग घ्यावी लागत आहे. एक एकर कांदा रोपांसाठी पन्नास हजाराचा भाव फुटल्याने म्हणजे सोन्याच्या भावात रोपांची किमती झाल्याने शेतकरी कांदा रोपांसाठी भटकंती करत आहेत. मोठ्या प्रमाणात



शेतकऱ्यांची कांदा रोपे खराब झाल्याने गाव, वाडी वस्त्यावर कांदा रोपांचाच विषय बोलला जात आहे. असल्याने शेतकऱ्यांना फक्त बाजारभाव ऐकायला मिळत आहेत, दीड दोन महिने पाऊस लांबल्याने शेतकऱ्यांच्या शेतात टाकलेले कांदा बियाणे पाणी साचल्याने सडून गेले, तर काही शेतकऱ्यांना पावसामुळे कांदा बियाणे टाकताच न आल्याने जमीन पडीक राहिल्या आहेत.तर काही शेतकऱ्यांनी पाऊस उघडल्यावर कांदा बियाणे टाकल्याने साहजिकच कांदा लागवड उशिरा होणार आहे.

अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या कांदा रोपांची फसगत झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी कांदा रोपांसाठी भटकंती करत आहे, परंतु आजचे उन्हाळं कांद्याचे बाजार भाव दिवसेंदिवस कमी होत चाललेले असून, कांदा रोपांचे बाजारभाव बघता अनेक शेतकऱ्यांनी उन्हाळी मका, गहू या पिकांना पसंती दिली आहे, त्यामुळे भविष्यात कांदा लागवडीचे क्षेत्र घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# टेंबे गावातील एकाची तापी नदीत उडी घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शिरपूर तालुक्यातील गिधाडे लगत तापी नदी पुलावर दुचाकी उभी करून तरुणाने नदी पात्रात उडी घेतल्याची खळबळजनक घटना सोमवार, 21 नोव्हेंबर सायंकाळी घडली. सुरेंद्र सरदारसिंग राजपूत (24 , रा. टेंबे, ता. शिरपूर , धुळे ) असे मयत तरुणाचे नाव आहे असून मंगळवारी पोहणाऱ्यांना तरुणाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. तरुणाने आत्महत्या का केली याचे स्पष्ट कारण कळू शकले नाही. माहितीनुसार , शिरपूर तालुक्यातील टेंभे येथील सुरेंद्र सरदारसिंग राजपूत हा तरुण कृषी क्षेत्राशी निगडभत एक कंपनीत कार्यरत होता. सोमवारी सायंकाळी तरुणाने दुचाकी (एम. एच. 18 बी . के . 8251) ने गिधाडे गावाजवळील तापी पुलावर आला व दुचाकी उभी करताच तरुणाने तापी नदीत पात्रात उडी घेतली . पुलावरुन वाहतूक करणाऱ्या एका प्रवासीने त्याला उडी घेतांना बघितल्यानंतर आरडाओरड केल्याने घटनास्थळावर नागरीकांनी धाव घेतली . तरुणाची ओळख पटविण्यासाठी प्रवाशांनी व्हिडीओ काढून सोशल मीडियावर व्हायरल केले तर तरुणाच्या दुचाकी क्रमांकावरून त्याची ओळख पटताच टेंभे येथे माहिती कळवण्यात आली. मंगळवारी मृतदेहाच लागला हाती टेंभे येथील नातेवाईकांसह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली मात्र रात्री उशिरापर्यंत नदीपात्रात तरुणाचा मृतदेह हाती न लागल्याने मंगळवारी सकाळी पुन्हा तरुणाचा शोध सुरू करण्यात आल्यानंतर आठ वाजता मृतदेह हाती लागला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

# जिल्हा परिषद शाळा अंतरवाली खांडी येथे आनंदनगरी उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** तालुक्यातील खांडी अंतरवाली येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत सोमवारी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पाचोड केंद्राचे केंद्रप्रमुख बळीरामजी भुमरे सर व गावचे सरपंच रामनाथ डिगोळे, उपसरपंच नवनाथ कळमकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रभाकरराव ढाकणे, उपाध्यक्ष संतोष दसपुते, गजानन डिघुळे, यांच्या हस्ते आनंदनगरीचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या बाजाराला सुरुवात झाली या आनंदनगरी मध्ये विद्यार्थ्यांनी आपापले खाद्यपदार्थाचे स्टॉल लावलेले होते यामध्ये खाद्यपदार्थांमध्ये समोसा ,पोहे, पाणीपुरी, मटकी उसळ, पुरी भाजी, बटाटा वडा, पापड, जिलेबी, गुलाब जामुन, भजे, कढी, इडली ,सांबर,भाजी पाला, अशा घरगुती बनवलेल्या रुचकर व स्वादिष्ट पदार्थाची खमंग या शाळेच्या परिसरामध्ये दरवळून गेला होता.यावेळी विद्यार्थींनी आपापल्या शेतातील उपलब्ध भाजी, पाला, आणून विक्री केला यातुन विद्यार्थ्यांनी व्यवहार, ज्ञानाचा बोध घेतला तसेच सरपंच रामनाथ डिघुळे आणि गावकरी पालक आणि शिक्षक वृंद यांनी मुलांकडून नगद स्वरूपात फळे, आणि खाद्य पदार्थ व भाजीपाला खरेदी केला. त्यावेळी गावातील पालक नागरिक यांनी खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतला.व आपल्या पाल्याच्या दुकानदारीत लगबग पाहून पाल्यांच्या डोळ्यात कौतुकाचे भाव दिसुन येत होते. विद्यार्थ्यांनी आपले भाजी पाला व खाद्य पदार्थाची मांडणी बाजार प्रमाणे केली होती, त्यामुळे शाळेला बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच भारत अभियान अंतर्गत मातांची बैठक घेऊन केंद्रप्रमुख बळीरामजी भुमरे सर यांनी मातांना मार्गदर्शन केले. यावेळी गावचे सरपंच रामनाथ डिघुळे,शाळेचे मुख्याध्यापक रावसाहेब वाडेकर, शिक्षक राजेश खिल्लारे सर, काकासाहेब जाधव ,ज्योती बुरकुले, शोभा पोहरे ,ज्योती कराड, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक कृष्णा डिघुळे, कृष्णा जायभाये, विष्णू ताठे, वासुदेव डिघुळे, भागीरथी डिघुळे, तसेच अशोक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कदम, श्रीमती बेळगे मॅडम, वाघ मॅडम यांच्यासह गावातील महिला व पालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.



# फर्दापूर येथे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी घेतला बाकावर बसून चहाचा आस्वाद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे दि.२१/११/२२ सोमवार रोजी राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार हे नेहमी सामान्य माणसात मिळून मिसळून राहतात. कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांचा साधेपणा पुन्हा समोर आला आहे. सोयगाव तालुक्यात विविध विकास कामांच्या उदघाटन प्रसंगी आलेल्या कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी कार्यक्रमानंतर सोबत असलेले अधिकारी, सुरक्षा कर्मी, पदाधिकारी व गावकऱ्यांसोबत फर्दापूर येथील चहाच्या टपरीवरील बाकावर बसून चहा घेतला. मंत्री पदाचा कोणताही अभिमान न बाळगता मंत्री अब्दुल सत्तार यांनी चहावाला शेख आवेस याला आपल्या बाजूने बसवून त्याची आपुलकीने विचारपूस केली. अनेकांनी हा प्रसंग आपल्या कॅमेरात टिपला. त्यानंतर मंत्री अब्दुल सत्तार यांची " चाय पे चर्चा " चांगलीच रंगली. मंत्री अब्दुल सत्तार यांचा हा पहिला प्रसंग नसून ते दौऱ्यात असतांना सर्व सामान्य माणसाला मोठ्या आस्थेने विचारपूस करून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतात. आपला ताफा थांबवून कधी शेतकरी - शेतमजूर, विद्यार्थ्यांशी संवाद तर कधी गावातील जेष्ठ नागरिकांच्या हाताने विकास कामांचे उद्घाटन करणे आशा एक ना अनेक प्रसंगातून मंत्री अब्दुल सत्तार यांचा साधेपणा पहायला मिळातो. फर्दापूर येथे बाकावर बसून चहा घेत असताना मंत्री अब्दुल सत्तार यांनी गावकऱ्यांसोबत मिसळून गमतीजमती करत मनसोक्तपणे संवाद साधला. मंत्री अब्दुल सत्तार यांचा हा साधेपणा पाहुन उपस्थित सर्वचजण चक्क राहून गेले.यावेळी बाळासाहेबांची शिवसेनेचे तालुकाप्रमुख प्रभाकर काळे, माजी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव, माजी सभापती धरमसिंग चव्हाण, सुरेश चव्हाण( सामाजिक कार्यकर्ते ),उस्मान खा पठाण यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, पदाधिकारी,मान्यवर व गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.अशी माहिती जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in